# भाग्य आणि बुद्धी

म.ग्रं.सं. वाच
विषय : ....
दा.क्र. : 3

राजा मंगळवेढेकर



BVBK-0403543

वाचनालय
3583
२६।३।९९

# भाग्य आणि बुद्धी

BVBK-0403543

राजा मंगळवेढेकर

मधुराज पब्लिकेशन्स प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

# ✧ भाग्य आणि बुद्धी ✧

BHAGYA ANNI BUDDHI

✧ प्रकाशक ✧
राजीव दत्तात्रय बर्वे
मॅनेजिंग डायरेक्टर
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

✧ एकमेव वितरक ✧
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ, पुणे ४११ ०३०

✧ © राजा मंगळवेढेकर ✧
९ अशोकबन, मॉडेल कॉलनी, पुणे – ४११०१६

✧ प्रथमावृत्ती ✧
१५ मार्च १९९९

✧ प्रकाशन क्रमांक – ८७९ ✧

✧ ISBN - 81 - 7294 - 227 - 3 ✧

✧ मुद्रक ✧
गिरीश जोशी
साथीदार प्रिंटर्स
४६१/१ सदाशिव पेठ, पुणे – ४११०३०

✧ टाईपसेटिंग ✧
उद्गार टाईपसेटर्स
६०३ एफ् /. डी पर्वतीनगर,
सिंहगडरस्ता, पुणे – ३०

✧ मुखपृष्ठ व आतील चित्रे ✧
निशा डंके

✧ मूल्य ✧
रुपये तीस मात्र

# भाग्य आणि बुद्धी

राजा मंगळवेढेकर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १. भाग्य आणि बुद्धी | ५ |
| २. म्हाताऱ्या शेतकऱ्याची गोष्ट | १२ |
| ३. नक्कीच | १९ |
| ४. मोक्षाचा मार्ग | २६ |
| ५. मातीचा सुगंध | ३१ |
| ६. बाळ माझं छोटं | ३९ |
| ७. मोलाचा उपदेश | ४४ |
| ८. ससुल्या | ५२ |

# भाग्य आणि बुद्धी

एकदा बुद्धी आणि भाग्य यांची गाठ पडली. बोलता बोलता दोघांत, ठिणगीचा वणवा व्हावा तसे भांडण जुंपले. दोघेही अहंकारी, गर्विष्ठ.

बुद्धी म्हणाली, "मी श्रेष्ठ!"

भाग्य म्हणाले, "मी श्रेष्ठ!"

या भांडणात कोणीच माघार घ्यायला तयार नाही. भांडता भांडता त्यांचे त्यांनीच ठरवले, "चला, आपण आपल्या शक्ती-युक्तीचं बळ अजमावूनच पाहू. जो वरचढ ठरेल, तो जिंकेल!"

निघाले दोघेही. जाता जाता एका रानात शेळ्या-मेंढ्या राखत असलेला एक गुराखी त्यांना दिसला. गुराखी मजेत शीळ घालत मधूनच काहीतरी गुणगुणत होता. त्याच्याकडे पाहून, हसत हसत बुद्धीने भाग्याला विचारले, "या गुराख्याला तू धनी बनवशील!"

"का नाही? धनीच नव्हे, तर मी याला सम्राटसुद्धा बनवू शकतो." भाग्य म्हणाले.

बुद्धी खो खो हसली आणि म्हणाली, "अडाणी कधी सम्राट होईल? हां, सम्राट होता होता तो जीव घालवून बसू नये म्हणजे झाले!"

"तसे होणार नाही!"

"ठीक आहे. बघू या" - बुद्धी म्हणाली.

भाग्य गुराख्याजवळ गेले नि आपला हात त्याच्या मस्तकावर ठेवला. बुद्धीने आपले हात आवरून घेतले नि ती बाजूला गेली.

गुराखी शीळ घालीत चालला. जाता जाता काही तरी चकाकले. म्हणून तो खाली वाकला. पाहातो तर एक रत्नजडित वहाणांचा जोड

त्याला दिसला.

"अरे, हे काय? कसले पायताण हे?" गुराख्याने स्वत:शीच म्हटले. त्याने वहाणांची जोडी उलटीपालटी करून पाहिली. पायात घातली. आरोळी ठोकीत गुरांच्या मागे चालला.

"ह्ये ऽऽ थिर्र र्र र्र ऽऽऽ"

त्याच वेळी कोणी एक व्यापारी तिकडून चाललेला होता. त्याचे लक्ष अचानकपणेच गुराख्याच्या पायातल्या वहाणांकडे गेले. त्याच्या रत्नपारखी नजरेला त्या मौल्यवान वहाणा पडताच, त्याला कमालीचे आश्चर्य वाटले. त्याने गुराख्याला विचारले, "अरे, तू ह्या कसल्या वहाणा घातल्या आहेस?"

"रंगीबिरंगी दगड बसविलेल्या," गुराख्याने सहजपणाने सांगून टाकले.

"मला या विकत देतोस! मला फार आवडल्या या वहाणा" व्यापाराने म्हटले.

"आवडल्या, तर ह्या घ्या. विकायच्या काय त्या! मी कुठे विकत घेतल्यात?"

"नाही नाही, मला त्या फुकट नकोत. तू काही तरी किंमत सांग."

"कसली किंमत बाबा? बरे, म्हणतोस तर त्या माझ्या झोपडीत फुटाण्याची एक थैली ठेवून दे. भूक लागली म्हणजे खात जाईन इथल्या इथेच."

"ठीक आहे," व्यापारी म्हणाला आणि फुटाणे ठेवून रत्नजडित वहाणा घेऊन गेला.

आपल्या देशाला गेल्यावर त्याने मनात विचार केला की, "या वहाणांचा आपल्यालाही उपयोग नाही, तर या वहाणा प्रधानजीला देऊ.

म्हणजे व्यापारात सूट सवलत तरी मिळेल!''

इकडे गुराखी आपला पुन्हा अनवाणी तो अनवाणीच! काट्यां-कुट्यांतून नि दगडधोंड्यांतून चालला हिंडत-फिरत.

बुद्धी गालातल्या गालात हसली. भाग्याला ते मिस्किलपण कळले. त्याने मग माणके-पाचूने जडावलेल्या सुवर्णाच्या वहाणा गुराख्याच्या वाटेवर ठेवल्या. गुराख्याने त्या लखलखत्या वहाणा पायात घातल्या नि चालला शीळ घालीत गुरांच्यामागे.

काही दिवसांनी तो व्यापारी पुन्हा त्या रानातून चालला होता. त्यावेळी त्याने गुराख्याच्या पायातल्या त्या मूल्यवान वहाणा पाहिल्या. चकित झाला. मनाशी म्हणाला, ''काय हा पोरगा भाग्यवान आहे!''

व्यापारी गुराख्याला म्हणाला, ''अरे, असल्या खुबसुरत वहाणा तुला कुठे मिळाल्या?''

''मला तर या इथे रानात वाटेवरच सापडल्या,'' गुराख्याने सांगितले.

''मग मला देतोस या वहाणा? मला फार फार आवडल्या आहेत,'' व्यापाऱ्याने विचारले.

गुराखी म्हणाला, ''घेऊन जा.''

''काय किंमत देऊ बोल?''

''सापडलेल्या वहाणांची किंमत कसली? जा घेऊन अशाच,'' गुराखी म्हणाला.

''नाही, नाही! काही तरी घेच.''

''मग परवासारखे फुटाणे दे.''

व्यापाऱ्याने दोन पोती फुटाणे आणि चार गुळाच्या ढेपी गुराख्याच्या खोपटात ठेवल्या नि त्या वहाणा घेऊन गेला.

''या मूल्यवान वहाणा राजाच्या पायातच शोभतील. राजाला

दिल्या, तर व्यापारात पुष्कळच सूट सवलत मिळेल.''

व्यापाऱ्याने त्या वहाणा राजाल्या दिल्या, तेव्हा राजा फारच खूष झाला.

व्यापाऱ्याला म्हणाला, ''तुला ह्या मूल्यवान आणि अतिशय सुंदर वहाणा कुठे मिळाल्या?''

आता काय सांगणार? पण व्यापारी चटकन् म्हणाला, ''माझ्या एका सम्राट मित्राने मला ह्या दिल्या. शिकारीच्यावेळी सम्राटांच्या प्राणावर बेतले होते, पण मी त्यांचे रक्षण केले. म्हणून खूष होऊन त्यांनी मला हे पारितोषिक दिले आहे. मी विचार केला, आपण एक व्यापारी गृहस्थ. आपल्याला या असल्या वहाणा शोभणार नाहीत. त्यांची शोभा महाराजांच्या पायीच वाढणार. म्हणून महाराजांच्या चरणी मी त्या आणल्या आहेत.''

''छानच आहेत या वहाणा!'' खूष होऊन राजा म्हणाला, ''एवढ्या सुंदर वहाणा ज्याच्याजवळ आहेत आणि जो त्या बक्षीस देऊ शकतो, त्या सम्राटाला मुलगा असेलच!''

''होय महाराज, आहे! तरुण, लग्नाचा आहे!'' व्यापारी बोलून गेला.

''असे! मग त्याला आपली राजकन्या दिली तर?''

''फारच छान होईल महाराज!''

''मग हे जुळवून आणण्याचे काम तुमचे!''

''ठीक आहे महाराज,'' व्यापारी म्हणाला. राजाने व्यापाऱ्याला खूपशी संपत्ती, मानमरातब सर्व काही दिले.

व्यापाऱ्याच्या धूर्तपणाने ही कमाई झाली खरी, पण आता हे लग्नाचे काम कसे व्हावे! व्यापाऱ्याने विचार केला आणि शेकडो उंटांवर शेकडो मण पितळ लादून गुराख्याच्या झोपडीकडे गेला. तिथे पितळेचा

ढीगचा ढीग उभा केला. बरोबर आणलेले नोकर चाकर, दास दासी यांच्या राहुट्या आणि तंबू उभे केले.

गुराखी संध्याकाळी रानातून परतला. व्यापाऱ्याला पाहून त्याला आनंद झाला. गुराख्याच्या पायात यावेळीही आणखीन मूल्यवान व आणखीन सुंदर अशा वहाणा होत्याच!

व्यापाऱ्याच्या मनी आले, हा गुराखी म्हणजे कोणी जादूगार तर नव्हे? भाग्य याच्यावर प्रसन्न आहे! पण याला त्याची काहीच कल्पना नाही. भाग्य प्रसन्न आहे आणि दिसायलाही हा तरूण सुंदर आहे. याला सम्राट बनवायला काहीच हरकत नाही. आपण सध्या आपली संपत्ती खर्चून महाल बांधावा, जमीन जुमला घ्यावा, हत्ती, घोडे आणावेत, याला सम्राट करावे आणि आपण प्रधान बनावे.

भाग्याला ही गोष्ट मंजूर होती, पण बुद्धी गालातल्या गालात हसत होती.

भाग्याने पितळेचा ढीग सोन्याचा करून टाकला!

गुराखी व्यापाऱ्याला म्हणाला, "हे काय, यावेळी हे काय बरोबर आणले आहेस? आणि या गर्दीत मी माझ्या शेळ्या मेंढ्या कुठे बांधू?"

"राहू दे तुझ्या शेळ्या, मेंढ्या. तू नकोस त्यांची आज काळजी करूस. मी तुला राजा करणार आहे. सम्राट बनवणार आहे."

"राजा? सम्राट?"

"हां! सम्राट!"

"सम्राट म्हणजे काय असते?" गुराख्याने गोंधळून, घाबरून, विचारले.

"कळेल तुला, तुझे राजकुमारीशी लग्न होईल."

"राजकुमारीशी लग्न?"

"हो."

"तू काय म्हणतो आहेस, हे माझ्या काहीसुद्धा लक्षात येत नाही" गुराखी आणखीनच गोंधळून गेला.

व्यापाऱ्याने पुढची तयारी सुरू केली. पितळेचा ढीग सोन्याचा झालाच होता! भाग्याची साथ होती.

महाल उभा राहिला. नोकर चाकर वाढले. गुराख्याच्या अंगावर उत्तमोत्तम कपडे चढले. दागदागिने आले. शेळ्यामेंढ्या हाकलून लावल्या गेल्या.

गुराख्याला या सुखातही ते दुःख अनावर झाले. तो धाय मोकलून रडू लागला. व्यापाऱ्याने त्याची समजूत काढण्याचा पुष्कळ प्रयत्न केला, पण व्यर्थ!

या मूर्खाला काय करावे? समजावले तरी कळत नाही. ऐकत नाही. मग त्याने हातात काठी घेतली आणि तडाखे देत म्हणाला, "खबरदार रडला-ओरडलास तर!"

बुद्धी भाग्याला म्हणाली, "अरे बघ, तुझ्या सम्राटाला काठीचे तडाखे खावे लागत आहेत!"

भाग्य म्हणाले, "वडिलधाऱ्यांचा तो अधिकारच आहे."

बुद्धी हसत राहिली.

पुढे योग्य समयी गुराख्याचे राजकन्येशी लग्न ठरले. लग्नाची धामधूम सुरू झाली. हत्ती, घोडे, उंट सजले. त्यावर शस्त्रधारी सैनिक आरूढ झाले. गुराखी व्यापाऱ्याला म्हणाला, "हे लोक माझ्या शेळ्या, मेंढ्या तर पळवून नेणार नाहीत?"

लग्नसोहळा थाटामाटात पार पडला. सम्राट बनलेल्या गुराख्याचा दाही दिशांना जयजयकार दुमदुमला!

भाग्याने गर्वाने बुद्धीकडे पाहिले. ती म्हणाली, "हे कुणामुळे? व्यापाऱ्यामुळे. मी काही अजून व्यापाऱ्याची साथ सोडली नाही."

गुराखी या मोहपाशात गुदमरून गेला होता. त्याला अगदी दूर पळून जावेसे वाटत होते. रात्री तसेच घडले. एका भव्य महालात तो होता. अत्तराचे दिवे जळत होते, नाना तऱ्हेचे पदार्थ, फळे ठेवलेली होती. उंची पडदे, गालिचे, गाद्या-गिरद्या-कशालाच कमी नव्हते. पण गुराखी गुदमरला होता. त्याने पाहिले, तो एकटाच आहे. व्यापाऱ्याची धाकाची नजर नाही, काही नाही. पळावे येथून. तेवढ्यात नूपुरांचे छुन छुन आवाज कानी आले. गुराखी आणखीनच घाबरला. उठला नि सज्जातून उडी घेण्यासाठी सरसावला. उडी घेणार तोच बुद्धी पुढे सरसावली. तिने मागे खेचले. भाग्याला म्हणाली, ''सांभाळ तुझ्या सम्राटाला! प्राणास मुकला असता.''

भाग्य ओशाळून गेले. शरमले. म्हणाले, ''काय करू, मूर्खाशी गाठ पडली, एवढा मी याला सम्राट बनवला पण त्याला त्याची किंमत नाही.''

''ती बुद्धीशिवाय कळणार नाही.'' बुद्धी म्हणाली.

''खरे आहे.'' भाग्याने आपली हार मानली.

बुद्धीने मग आपला हात गुराख्याच्या मस्तकावर ठेवला. गुराखी हळूहळू सगळे उमजू लागला. लवकरच शहाणाही झाला.

✳ ✳

# म्हाताऱ्या शेतकऱ्याची गोष्ट

गोष्ट आहे परदेशातली - जपान-कोरियाकडली. कोरिया देशात 'छ्यू' नावाचं एक गाव आहे. मोठं शहरच आहे. गजबजलेलं आहे.

एकदा छ्यू शहरावर जपानी सैनिकांनी हल्ला केला आणि शहर ताब्यात घेतलं. छ्यू शहर वसलेलं आहे, घनदाट झाडीत. शिवाय त्याच्याभोवती दगडी उंच भिंतीची तटबंदीही केलेली आहे. झाडी दाट आणि तटबंदी भक्कम! जपानी सैनिक रात्रंदिवस तटबंदीच्या बाहेर पहारा देत उभे असत.

कोरियाचा राजा फारच भित्रा होता आणि व्यसनीदेखील होता. व्यसनी, जुगारी, बदमाश अशा नालायक मंत्र्यांच्या गराड्यात तो सदैव असायचा. ही मंडळी राजाला खोटं-नाटं सांगून अंधारात ठेवायची. रोज रोज सांगायची,

"महाराज, आपण काळजी करू नका. लवकरच छ्यू भोवतीचे जपानी सैनिक पिटाळून लावले जातील! त्यांना हुसकून दिले जाईल...!" रोज-रोज हे ऐकून एकदा राजालाही फार कंटाळा आला. त्यानं आपल्या संरक्षण मंत्र्याला बोलावून सांगितलं,

"नुसते वायदे करून आणि रोज रोज तेच तेच सांगून यापुढं भागणार नाही. लवकरात लवकर 'छ्यू'ची सुटका जपान्यांच्या तडाख्यातून झाली पाहिजे. नाही तर तुझा शिरच्छेद केला जाईल!"

राजानं दिलेली धमकी ऐकून इयोन चिल नावाचा तो संरक्षणमंत्री फारच घाबरून गेला. त्याची झोप उडाली. कारण जपानी सैनिकांना हुसकावून लावणं तसं सोपं नव्हतं. पण ते करावंही लागणार होतं. नाहीतर प्राण गमवावे लागणार होते.

एके दिवशी इयोन चिल यानं वेष बदलला आणि छ्यू शहराच्या आसपासची परिस्थिती तरी काय आहे, हे जाणण्यासाठी म्हणून बाहेर पडला.

सगळ्या शहराला जपानी सैनिकांनी वेढलेलं होतं आणि डोळ्यात तेल घालून ते पहारा देत होते. त्यांना पाहताच इयोन चिलची घाबरगुंडी उडाली! तो स्वत: फारच भित्रा होता. संरक्षणमंत्री बनायला अगदीच अपात्र होता. पण आता काहीतरी करायला हवंच होतं. राजाच्या धमकीची टांगती तलवार त्याच्या शिरावर लटकत होती. घाबरलेल्या मनानंच तो परत येत होता. त्याचवेळी रस्त्याला लागून असलेल्या एका शेतात नांगरणी चाललेली होती. म्हातारा शेतकरी नांगराला बैल जोडून नांगर चालवीत होता. अधून-मधून बैलांना चापत होता. दाटत होता. दाटताना तो आपल्या काळ्या बैलाला म्हणाला, "तू तर अगदी इयोन चिल सारखाच झाला आहेस? फुगून बसतोस? पुढं जाण्यानं तुझी म्हातारी कचकते काय?" हे ऐकताच संरक्षणमंत्र्याला संताप चढला. तो

शेतकऱ्याजवळ जाऊन म्हणाला, "मूर्खा, तू इयोन चिलला शिवी देतोस? अरे बुद्ढ्या, त्याच्या बहादुरीचे पोवाडे लोक गात असतात!"

म्हातारा शेतकरी हसला. उपरोधानं म्हणाला, "हां, तो बहादूर आहे खरा! छ्यू शहराभोवती जपान्यांनी वेढा टाकलाय, हे त्याच्या बहादुरीचंच दर्शन आहे! शत्रूनं वेढलेल्या शहराची सुटका त्या बहादूर बिचाऱ्याला अजूनही करता आलेली नाही....!"

"अरे बुद्ढ्या, सारं शहर घनदाट झाडीनं वेढलेलं आहे, हे तुला काय दिसत नाही?" संतापानं चिडून इयोन चिलनं विचारलं.

म्हाताऱ्या शेतकऱ्यानं सांगितलं, "अरे बाबा, ही झाडी शहर वाचवण्यासाठी नष्ट करायला त्याचे हात कोणी बांधले आहेत?"

"गप्प बैस! बडबड करू नकोस! झाडीच्या मागं जपानी सैनिक हातात शस्त्र घेऊन उभे आहेत. झाडीतून ते कुत्र्या-मांजरांनाही फिरकू देत नाहीत."

"असं! इतकं भय जर शत्रूविषयी मनात असेल तर मग देशाचं संरक्षण कसं करणार? प्रत्येक देशभक्ताला आपल्या मातृभूमीचं संरक्षण करण्याची कला आणि धैर्य अवगत असलंच पाहिजे." म्हातारा म्हणाला.

"तू तर अशी भाषा बोलतो आहेस बुद्ढ्या की जसं काही तुझ्यात ते धैर्य आणि कला भरलेली आहे!"

"हो-हो! आहेच! म्हातारा झालो म्हणून काय झालं? माझ्या रक्ताच्या थेंबा-थेंबात ती धमक आजही आहे. मला जर आजपासून पंधरा महिन्यांनंतर शंभर लढवय्ये तरुण मिळतील तर मी छ्यू शहरावर कोरियाचा झेंडा फडकवून दाखवीन!" म्हातारा त्वेषानं म्हणाला.

"बाता तर लंब्या लंब्या मारतो आहेस. ठीक आहे! मी तुला शंभर योद्धे देतो. पण जर तू तुझ्या शब्दापासून मागं हटलास तर याद राख!

तुझ्या कातडीनं ढोल मढवून घेईन, लक्षात ठेव!''

''हां हां, ठेवलं लक्षात! मीही काही असातसा नाही!''

इयोन चिल राजाकडं गेला आणि राजाला त्यानं म्हाताऱ्याचं म्हणणं सांगितलं. ते ऐकून राजा उपहासानं हसू लागला. म्हणाला, ''अरे, त्या बडबड्या म्हाताऱ्यावर लक्ष ठेवा, नाही तर पळून जाईल कुठंतरी. पळून गेल्यावर त्याची मुंडीही छाटता यायची नाही.''

दुसऱ्या दिवसापासून राजाचे शिपाई म्हाताऱ्या शेतकऱ्याच्या झोपडीभोवती टेहाळणी करू लागले. म्हाताऱ्यावर लक्ष ठेवू लागले. दिवसभर असं लक्ष ठेवल्यावर संध्याकाळी त्यांनी राजाला जाऊन सांगितलं, ''म्हातारा दिवसभर कागदाच्या लहान लहान पिशव्या बनवीत बसला होता.''

ओळीनं दहा दिवस म्हाताऱ्या शेतकऱ्यानं हेच काम केलं. कागदाच्या पिशव्याच पिशव्या बनवल्या...!

अकराव्या दिवशी संध्याकाळी पहारा देणाऱ्या शिपायांनी राजाला माहिती दिली, ''म्हातारा दिवसभर कागदाचे पतंग तयार करीत होता!''

पुढे दहा दिवस म्हातारा हेच काम करीत राहिला. त्यानं पतंगच पतंग तयार केले....!

एकविसाव्या दिवशी पहारा देणारे शिपाई राजाला सांगू लागले, ''सकाळपासून संध्याकाळपर्यंत म्हाताऱ्या गावातल्या पोराठोरांना घेवून पुष्कळ पतंगच उडवीत होता....!''

राजा उपहासानं हसून म्हणाला,

''बहुधा त्याला वेड लागलं असावं. त्याची गर्दन उडविलीच पाहिजे!''

संरक्षणमंत्री राजाला शांत करीत म्हणाला,

म्हाताऱ्या शेतकऱ्याची गोष्ट

"काही दिवस थांबा. मी त्या म्हाताऱ्याला पंधरा महिन्यांची सवलत दिलेली आहे. तो पळून पळून तरी कुठं जाईल? आपला पहारा आहेच!"

"ठीक आहे. पण त्याच्यावर सक्त नजर ठेवा!" राजानं हुकूम दिला.

महिन्यांमागून महिने उलटले. हळूहळू उन्हाळा गेला. थंडी आली. थंडी गेल्यावर वसंत ऋतूचं आगमन झालं...! शेतकरी म्हातारा दिवसभर शेतात घाम गाळत होता. कधी घराचं छप्पर ठाक-ठीक करायचा तर कधी वाखांपासून दोऱ्या बनवायचा. जंगलातून वाळलेली लाकडंही गोळा करून आणायचा. केलेला वायदा तो जणू विसरूनच गेला होता...!

वृद्धढ्या शेतकऱ्याच्या झोपडीभोवती राजाच्या शिपायांची वर्दळ मग बरीच वाढली. एके दिवशी शेतकरी डोंगरावर उभा राहिला. बराच वेळ छ्यू शहर निरखीत राहिला. संध्याकाळच्या वेळी एका शिपायाला तो म्हणाला, "इयोन चिल याला कुणीतरी जाऊन माझा निरोप सांगा. म्हणावं. या महिन्याच्या एकवीस तारखेला मी शंभर योध्यांची वाट बघीन!"

एकवीस तारीख उगवली. राजानं शंभर तरूण योद्धे आणि त्यांच्याबरोबर एक जल्लादसुद्धा पाठवला. तो अशासाठी की, म्हाताऱ्या शेतकऱ्यानं जर आपला वायदा पुरा केला नाही तर त्याची गर्दन त्यानं छाटून टाकावी!

मध्यरात्र झाली. शेतकऱ्यानं सैनिकांना सांगितलं,

"रांगत रांगत माझ्या पाठीमागून या. कुणालाही चाहून लागता कामा नये."

म्हातारा शेतकरी पुढं चालला होता आणि सगळे सैनिक त्याच्यामागून रांगत निघाले होते. अशा रीतीनं काही अंतर काटल्यावर

शेतकऱ्यानं हलक्या आवाजात सैनिकांना थांबण्याचा इशारा दिला. मग त्यातील दहा तगडे सैनिक घेऊन तो पुढे सरकला. सगळीकडं अंधार पसरलेला होता. काही वेळानं हा वेगवेगळ्या ठिकाणांहून आगीचा जाळ दिसू लागला! वारा जोरात वाहत होता. त्यामुळं आगीच्या ज्वालांनी वाळलेली झाडं वेढून टाकली. ती जळू लागली. त्यांच्या ज्वाला आकाशाकडं झेपावू लागल्या. म्हातारा शेतकरी आनंदानं नाचत ओरडू लागला, "मानसे! मानसे!!"

कोरिया भाषेत 'मानसे' म्हणजे "जिंकले! जिंकले!!"

शेतकऱ्याच्या विजयघोषणेनं कोरियन सैनिकांचं अंत:करण उत्साहानं भरून गेलं! वीरश्रीचं वारं त्यांच्यात संचारलं! मग तेही 'मानसे-मानसे....!' अशा घोषणा करीत किल्ल्यात घुसले. जपानी सैनिकांना अशा अचानक हल्ल्याची सुतराम कल्पना नव्हती. ते गोंधळून गेले. गडबडून गेले आणि त्यांनी शरणागती पत्करली. सकाळ झाली. राजा शेतकऱ्याजवळ आला. त्यानं त्याला विचारलं,

"झाडीपर्यंत आग पोहचलीच कशी?"

शेतकऱ्यानं सांगितलं, "मी दहा तगड्या सैनिकांना झाडीजवळच्या सुक्या गवताला आग लावण्यास सांगितलं होतं."

हे ऐकताच जवळच उभा असलेला संरक्षणमंत्री गुरगुरत म्हणाला,

"खोटं बोलू नकोस. किल्ल्याच्या आसपास वाळलेलं गवत नव्हतंच! असतं तर मी नसती का त्याला आग लावली?"

शेतकरी म्हणाला, "तिथं गवत उगवायला तुम्हाला कोणी मनाई थोडीच केली होती?"

संरक्षणमंत्री संतापानं पुन्हा गुरगुरला, "जपानी सैनिक झाडीजवळून जनावरांनादेखील फिरकू देत नव्हते. मग तू तिथं गवत कसं

उगवलंस?"

म्हातारा शेतकरी शांतपणानं म्हणाला, "शत्रूशी लढण्यासाठी धनुष्यबाण, तलवार अशा शस्त्रांची आवश्यकता असते, पण विजय मिळविण्यासाठी शत्रूपेक्षा अधिक हुशारी दाखवावी लागते. मी काय केलं ते ऐका - ओळीनं दहा दिवस मी कागदांच्या पिशव्या केल्या. पतंगाच्या शेपटीला त्या पिशव्या बांधल्या, प्रत्येक पिशवी गवतानं आणि बियाणांनी भरलेली होती. मग ते पतंग मुलांकडून उंच उंच उडवले. उंचीवरच्या झाडीत ते अडकले. फाटले. पिशव्याही फाटल्या. त्यांच्यातले गवत आणि बी सगळीकडे विखरून पडले. वसंत ऋतू येताच त्या बिजांना अंकूर फुटले. उन्हाळ्यात गवत सुकून गेले. तेच काल रात्री मी जाळून टाकले."

म्हाताऱ्या शेतकऱ्याचं बोलणं ऐकून राजाचे सैनिक आणि अधिकारी कुत्सितपणानं हसले आणि म्हणाले, "हे तर आम्हालाही करता येत होतं!"

म्हाताऱ्या शेतकऱ्यानं विचारलं, "मग का केलं नाहीत?"

संरक्षणमंत्र्याची मान खाली झाली. तो एक शब्दही बोलला नाही.

पण म्हातारा शेतकरी तिथं न थांबता रस्ता चालू लागला. मनाशी पुटपुटला, "मी माझं काम बजावलेलं आहे. आता या मूर्खांच्यामध्ये राहाण्यात अर्थ नाही. ह्यांचं हे गाव ह्यांना लखलाभ असो!"

# नक्कीच

अशीच एक गोष्ट. म्हटली तर गमतीची, म्हटली तर युक्तीची.

धनचंद नावाचा एक धनी-मानी व्यापारी एका गावात राहात होता. धनचंद दिसायला जितका उग्र आणि कठोर होता तितकाच तो अंत:करणाने निर्मम आणि निर्दय होता. धनचंदाची शेतीवाडीही पुष्कळ होती. उद्योग-धंदेही बरेच होते. व्यापार मोठा होता, पैसा अफाट मिळत होता., परंतु वृत्तीने मात्र तो दरिद्री होता. आपल्या हाताखालच्या नोकराचाकरांशी तो फारच दुष्टपणाने वागत असे. प्रत्येकाला टाकून बोलत असे. कोणावरही अत्याचार करीत असे. लोक त्याच्यावर असंतुष्ट होते. पण धनचंद पडला पैसेवाला! त्यामुळे त्याला विरोध करण्याची हिंमत कोणी दाखवीत नसे. एकदा धनचंदाने आपल्या शेतावर काम करणाऱ्या एका दादू नावाच्या गरीब मजुराला कामावरून काढून टाकले. दादू चार पाच दिवस तापाने फणफणंत होता आणि त्यामुळे कामावर येऊ शकणार नव्हता. याची शिक्षा म्हणून धनचंदाने दादूची आजवरची पाच सहा वर्षांची, त्याने इमानाने केलेली सेवाचाकरी लक्षात न घेता त्याचा घास हिरावून घेतला होता. दादूने त्याच्यापुढे पदर पसरला आणि दयेची याचना केली, परंतु धनचंदाला घाम फुटला नाही. त्याने दादूला धुडकावून लावले, हाकलून दिले.

बिचारा दादू हताश-निराश होऊन आपल्या गावी परत आला. त्याची परिस्थिती पाहून गाववाल्यांना दया आली आणि त्यांनी दादूसाठी काही पैसे जमा केले. कारण दादू हा फार चांगला माणूस होता. प्रामाणिकपणे कष्ट करून जगणारा आणि सगळ्यांच्या उपयोगी पडणारा होता.

गाववाल्यांनी प्रेमाने दिलेले पैसे दादूने कृतज्ञ भावनेने घेतले.

गावकऱ्यांचे प्रेम पाहून दादूचे मन भरून आले. कुठे ही मोठ्या मनाची गरीब माणसे आणि कुठे तो छोट्या मनाचा श्रीमंत धनचंद.

दादू सरळ, साधा माणूस होता खरा, पण त्यालाही वाटू लागले की असा अन्याय सहन करून गप्प बसणे बरोबर नाही. धनचंदाला धडा शिकवलाच पाहिजे. दादू विचार करू लागला. विचार करता करता त्याला एक युक्ती सुचली. धनचंदासारख्या माणसाला धडा शिकवायचा तर तो युक्तीनेच शिकवावा लागणार होता.

दादूने जवळच्या गावी जाऊन एक पोपट विकत घेतला आणि त्याला सकाळ संध्याकाळ खपून फक्त एकच शब्द शिकविला. 'नक्कीच'. दादू काहीही म्हणाला तरी त्यावर पोपट म्हणायचा, 'नक्कीच!'

दिवसांमागून दिवस गेले आणि एके दिवशी दादू धनचंदाकडे आला. त्यावेळी त्याच्या अंगावर भारी किंमतीचे कपडे होते. हातात अंगठ्या होत्या. गळ्यात हार होता आणि खांद्यावर बोलका पोपट होता. दादूला अशा वेशात आणि थाटामाटात पाहून धनचंदालाही आश्चर्य वाटले. त्याने विचारले, "दादू, अरे कुठून एवढे पैसे आणलेस, काय करतोस?" दादू म्हणाला, "काही करण्याची मला गरजच नाही, ना व्यापार वा शेती, ना धंदा ना चाकरी! काहीच करीत नाही."

"कमाल आहे तुझी!" धनचंद आश्चर्याने म्हणाला.

"कमाल तर या पोपटाची आहे. तोतारामची. यानेच मला लक्षाधीश बनविले आहे."

"ते कसे काय?"

एकदा रात्री झोपलो असता माझ्या स्वप्नात देव आला. मला म्हणाला, अमक्या एका जंगलात जा. तिथं तुला एका झाडावर पोपट दिसेल. तो तू घे म्हणजे तुझे सगळे दुःख दूर होईल. तुझे कष्ट संपतील. तुझी उपासमार थांबेल. त्या पोपटाला सोन्या-रुप्याचे साठे कोठे दडलेले

आहेत ते अचूक ठाऊक आहे. हा पोपट तुला त्याबद्दल सांगेल. मग तूं ते घे. मी त्याप्रमाणे त्या जंगलात गेलो आणि हा पोपट घेऊन आलो. मी याचे नाव तोताराम असे ठेवले आहे. तोताराम मला सांगतो आणि मी त्या जागी दडविलेले धन मिळवितो. तोतारामच्या मार्गदर्शनामुळे लक्ष्मी माझ्या पायाशी चालून येते.''

हे अद्‌भुत ऐकताच धनचंदाचे डोळे विस्मयाने भरून आले. मोठे झाले. त्याला वाटू लागले की, हा एवढासा पोपट, एक साधा पक्षी एवढा चमत्कार कसा काय करू शकतो? एकीकडे धनाची लालसा आणि दुसरीकडे असा संशय! धनचंद दादूला म्हणाला, ''तू सांगतोस की तुझा तोताराम द्रव्याची जागा सांगतो म्हणून मी त्यावर कसा विश्वास ठेवावा? तू मला काही सिद्ध करून दाखवशील तर मी विश्वास ठेवीन.''

दादूला धनचंद असा संशय घेणार हे आधीपासूनच ठाऊक असल्यामुळे त्याने त्याच्याकडे येण्यापूर्वीच गावातील काही लोकांच्या - मित्रांच्या साहाय्याने एका तपेल्यात सोन्या-रुप्यांचे काही दागिने ठेवून ते तपेले एका जुनाट विहिरीच्या तळाशी ठेऊन दिले होते. म्हणून तो धनचंदाला म्हणाला, ''का नाही? जरूर सिद्ध करून दाखवितो. चला माझ्याबरोबर.''

लालची धनचंद ताबडतोब दादूबरोबर निघाला. दादू त्याला त्या जुनाट विहिरीजवळ घेऊन आला आणि म्हणाला, ''तोताराम, ह्या विहिरीच्या तळाशी धन आहे काय रे?''

''नक्कीच!'' तोताराम म्हणाला.

मग दादूने विहिरीत उतरून तळातले ते तपेले वर काढले. सोन्या-रुप्याच्या दागदागिन्यांनी भरलेले ते तपेले पाहून धनचंद चकितच झाला! दादूने अशाच युक्तीने आणखी दोन-तीन ठिकाणी असे धन काढून दाखविले. त्यामुळे धनचंदाच्या मनातील संशय पार निघून गेला आणि

त्याला वाटू लागले की असा पोपट आपल्याजवळ हवाच. असा पोपट जर आपल्याला मिळाला तर आपण कोट्यधीश बनू. सोन्या-रुप्याची घरे बांधू. हिऱ्यामाणक्यांची तोरणे लावू. नवरत्नांच्या माळा घालू. अशा आशेने तो पार पछाडला गेला. पण असा हा गुणी पोपट आपल्याला मिळेल कसा? याचीही त्याला चिंता वाटू लागली. कारण दादू सहजपणानं तो आपल्याला कसा देईल? सरळ मागून तो देणार नाही. दमदाटी करून उपयोग होणार नाही. मग काय करावे, अशा विचारात तो पडला. पोपट तर मिळालाच पाहिजे.

विचार करता करता त्याला असे सुचले की, दादू हा आपला एके काळचा चाकर. गरीब. तेव्हा त्याला खूष करण्यासाठी एक मोठी मेजवानी आयोजित करावी. गावातले बडे बडे लोक जेवायला बोलवावेत. दादूचे मोठे स्वागत करून त्याची भरपूर स्तुती करावी. आणि असा मोठेपणा देऊन सगळ्यांच्यादेखत पोपटाच्या किंमतीबद्दल विचारावे. अशा वेळी दादूलाही नकार देणे जड जाईल आणि आपण तो सांगेल ती किंमत देऊन त्याच्याकडून तो पोपट खरेदी करून टाकू.

धनचंदाने आपल्या मनाशी हा विचार पक्का केला आणि एका चुटकीसरशी आपल्या नोकरा-चाकरांना बोलावून मेजवानीची तयारी करावयास सांगितली. त्याप्रमाणे ठरलेल्या वेळी मेजवानीची जोरदार तयारी करण्यात आली. दादू मेजवानीला उपस्थित राहिला. धनचंदाने दादूची आणि मेजवानीस आलेल्या बड्या बड्या लोकांची ओळख करून दिली. दादूची भरपूर स्तुती केली आणि दादूला म्हणाला, "दादू, तुझ्या या गुणी पोपटाची किंमत सांग. मी तो खरेदी करू इच्छितो."

"छे छे! मला माझा तोताराम विकावयाचा नाही." दादू म्हणाला.

पोपटाची अद्भुत करामत ऐकून तिथे जमलेल्या काही

धनिकांनादेखील हा पोपट आपल्याजवळ असावा असे वाटू लागले होते. त्यांच्यातील धनलालसा जागृत झाली होती. म्हणून तेही पोपट खरेदी करण्याच्या दृष्टीने दादूशी वाटाघाटी करू लागले. त्यांच्यात एक प्रकारची पोपट घेण्याबद्दल स्पर्धाच सुरू झाली. धनचंद तर अगदीच उतावीळ बनला होता. तो सगळ्यांपेक्षा जास्त रक्कम आपण देऊ असे सांगू लागला. दादूदेखील कमी वस्ताद नव्हता. तो त्याला धडा शिकविण्याच्या उद्देशानेच आलेला होता. म्हणून त्याने तसेच ताणून धरले होते. तो म्हणाला, "आपणाला तर आता ठाऊकच आहे की, माझा हा तोताराम म्हणजे चालता बोलता खजिनाच आहे. हा ज्याच्याजवळ राहील तेवढ्याच दिवसात तो जगातील सगळ्यात श्रीमंत बनेल.

हे ऐकताच धनचंदाची धनलालसा तर आणखीनच उफाळून आली. त्याने दादूला मोठमोठी अमिषे दाखवून पोपट देण्याबद्दल आग्रह सुरु केला. तेव्हा दादूही मोठ्या चतुराईने म्हणाला, "काही दिवस का होईना मी आपले मीठ खाल्ले आहे. त्यामुळे आपल्याला नकार देणेदेखील मला जड जात आहे. म्हणून मी या पोपटाची किंमत सांगण्यापेक्षा इथे जमलेल्या मंडळींनीच ती ठरवावी असे मला वाटते.

धनचंदाच्या पत्नीला तर जगातली सर्वात श्रीमंत स्त्री बनण्याची तीव्र इच्छा झाली होती. त्यामुळे ती चटकन म्हणाली, "काही हरकत नाही. या पोपटासाठी आम्ही आमची सगळी दौलत तुला देतो."

धनचंदालाही ते उचित वाटले. कारण, पोपट एकदा का हाती आला की, मग आपण आज आपल्याजवळ आहे त्यापेक्षा हजारपटींनी जास्त धनदौलत मिळवू शकू, म्हणून हा सौदा योग्यच आहे, असे त्यालाही वाटले.

सौदा सगळ्यांच्यादेखत पक्का झाला. ताबडतोब तशी कागदपत्रे तयार करण्यात आली आणि धनचंदाने आपली सगळी दौलत दादूच्या

नावाने करून दिली. सगळ्यांनी आनंदाने टाळ्या पिटल्या आणि धनचंदाला शुभेच्छा व्यक्त केल्या. दादूने आपला तोताराम धनचंदाच्या स्वाधीन केला. मेजवानीचा कार्यक्रम संपला. सगळेजण आपआपल्या घरी परतले. दादू मात्र तिथेच राहिला. कारण आता ती हवेली त्याच्याच मालकीची झाली होती. म्हणून धनचंदच आपल्या पत्नीसह पोपटाला घेऊन दुसरीकडे गेला.

दुसरे दिवशी पोपटाला घेऊन धनचंद धनाच्या लालसेने एका तळ्याच्या काठी गेला. पोपटाचे अद्‌भुत पाहण्यासाठी त्याने आपल्या काही मित्रांना बोलाविले होते. तळ्याच्या काठी गेल्यावर धनचंद पोपटाला म्हणाला, "तोताराम, या तळ्यात खजिना दडविलेला आहे काय?"

"नक्कीच" तोताराम म्हणाला.

धनचंदने ताबडतोब तळे खोदायला गडी लावले. गड्यांनी पुष्कळ खोदाई केली, पण दगड मातीशिवाय काहीच हाती लागले नाही. धनचंद मनात चरकला. मग तो एका पहाडाच्या पायथ्याशी गेला. तिथे त्याने पोपटाला विचारले, "तोताराम इथे खजिना सापडेल कां?"

"नक्कीच!" पोपट म्हणाला.

धनचंदाने पहाडाच्या पायथ्यालाही खोदाई सुरू केली. पण पुष्कळ खोदूनही दगड-मातीशिवाय काहीच सापडले नाही. तेव्हा धनचंद आणखीनच चरकला. असेच आणखी चार सहा ठिकाणी घडले. तेव्हा तर धनचंदाची भीतीने गाळणच उडाली. त्याने पोपटाला विचारले, "तोताराम, तू माझा घात केला आहेस काय?"

"नक्कीच!"

हे ऐकताच धनचंद दुःखाने पार वेडा झाला. त्याने रागारागाने पोपटाला म्हटले, "म्हणजे मी महामूर्ख ठरलो तर?"

“नक्कीच!” तोताराम म्हणाला.

त्याबरोबर संतापाने धनचंदाने पोपटाला खाली जमिनीवर आदळण्यासाठी जोराने भिरकावले. पण पोपट चपळाईने उडाला आणि पंख हालवीत ‘नक्कीच! नक्कीच!’ असे म्हणत उडून गेला.

# मोक्षाचा मार्ग

एका गावात एक सतहृदयाचा सत्पुरुष राहत होता. तो कोणाच्या अध्यातमध्यात नसायचा. आपण भलं आणि आपलं काम भलं, अशी त्याची रीत होती. त्याचं मुख्य काम होतं, ईश्वराची ध्यानधारणा करणं. देवाचं नामस्मरण करणं. भिक्षा मागून झोळीत पडेल ते आनंदानं खाणं. शरीर जगवण्यापुरतंच भिक्षा मिळवणं. त्यातही भिक्षा मिळाली तर आनंद, नाही मिळाली तरी आनंद! हा साधू कधी कोणाकडं जात नसे. कुणी त्याच्याकडं आलंच आणि काही बोललंच तर हा त्याच्याशी बोलत असे. उपदेश करीत असे. मार्गदर्शन करीत असे.

तर एकदा साधू असाच आपल्या ध्यानधारणेत मग्न होऊन गेलेला होता. डोळे मिटून समाधीत बुडालेला होता. त्याच वेळी गावातील एक गृहस्थ त्याच्याकडे आले. ते वकील होते. वकीलसाहेब आले आणि [illegible] आणि त्यानं

डोळे उघडले. डोळे उघडताच पुढं बसलेले वकील महाशय त्याला दिसले. त्यांना पाहताच साधूला नवल वाटलं! त्यानं त्यांना विचारलं, ''वकील महाशय, आज आपण इकडं कुणीकडं आलात?''

वकीलसाहेब हात जोडून साधूला म्हणाले, ''महाराज, मी एक नामांकित वकील आहे. हायकोर्टात वकिली करतो. माझी वकिली उत्तम चालते. पैसा पुष्कळ मिळतो. कामही खूप करतो. कामाच्या व्यापातून दुसऱ्या गोष्टींसाठी मुळीच वेळ मिळत नाही. गेली कित्येक वर्ष असंच चाललं आहे. पण माझंही वय आता बरंच वाढलं आहे. उतरणीकडं झुकलं आहे. म्हणून काही वेगळा विचार डोक्यात घोळू लागला आहे. आपलं नाव, आपली कीर्ती खूप दिवस ऐकून आहे. [illegible] आहे. पण आजवर वेळ मिळाला नाही.

म्हणून आज मुद्दाम वेळ काढून आलो आहे."

साधू हसत हसत म्हणाला, "बरं केलंत. चांगलं केलंत. अहो, असा वेळ काढला नाही तर कधीच वेळ मिळणार नाही. आपण आलात याचा आनंद झाला. पण आता हेदेखील सांगून टाका की, कोणत्या हेतूनं आला आहात?"

वकीलमहाशय म्हणाले, "महाराज, मला काहीतरी उपदेश द्या! मार्गदर्शन करा!"

साधूनं विचारलं, "महाशय, कसलं मार्गदर्शन करू? कोणता रस्ता दाखवू?"

वकीलमहाशयांनी सांगितलं, "महाशय, आपण मला मोक्षाचा मार्ग दाखवा!"

साधूनं हसून विचारलं, "महाराज, आपल्या कायद्यात असा मार्ग सांगितलेला नाही काय?"

हे ऐकताच वकीलमहाशय चक्रावले! साधूचे बोलणे त्यांच्या नीट लक्षातच आले नाही. म्हणून त्यांनी साधूला म्हटलं, "महाराज, कायद्यात मोक्षाचा मार्ग?... माझ्या काही लक्षात आलं नाही. मला काही समजलं नाही. कृपा करून समजावून द्या."

साधूनं विचारलं, "महाशय, तुमच्या कायद्याच्या पुस्तकात आपल्यासाठी कोणकोणत्या भल्या गोष्टी शिकवलेल्या आहेत?"

वकीलमहाशय म्हणाले, "आम्ही मानवाची सेवा केली पाहिजे. अपराध्याला शिक्षा आणि ज्यानं अपराध केला नाही त्याला संरक्षण दिलं पाहिजे. ईश्वराची शपथ घेऊन सत्यानं कायद्याचं पालन केलं पाहिजे..."

"वकीलमहाशय" हे सगळं ऐकून साधू म्हणाला, "मला एक गोष्ट आठवते आहे. गोष्ट साधीच आहे, पण सांगतो. एक होता व्यापारी. एकदा हा व्यापारी व्यापार करण्यासाठी चालला होता. तो नेहमीच

व्यापाराकरिता गावोगावी जायचा. तसे त्या दिवशीही चालला होता. परंतु त्या दिवशी रस्त्यात काही डाकूंनी त्याला घेरलं. त्याच्या जवळचं सगळं धन हिसकावून घेतलं आणि त्याला मारझोड करून जखमीदेखील केलं. धन लुटून डाकू पळून गेले. जखमी झालेला व्यापारी रस्त्याच्या कडेला विव्हळत पडला होता. त्याला उठण्याचीही शक्ती उरली नव्हती. मदतीसाठी तो रस्त्यानं जाणाऱ्या-येणाऱ्याकडं भीक मागत होता. त्याच रस्त्यानं त्यावेळी एक पुजारी चालला होता. पुजारी देवळात देवाची पूजाअर्चा करायचा. आरतीधुपारती ओवाळायचा. देवाच्या नावावर जगायचा. जाता जाता पुजाऱ्याला तो जखमी व्यापारी दिसला. त्याला मदतीची आवश्यकता आहे, हेही त्याच्या लक्षात आलं. अशा अवस्थेतल्या माणसाला मदत केली पाहिजे, ही धर्माची शिकवणही त्याला आठवली. पण तो तोंड वाकडे करून निघून गेला. थोड्या वेळाने त्या रस्त्यानं चाललेला एक वकील तिथं आला. त्याच्याही दृष्टीला तो



जखमी व्यापारी पडला. त्यालाही त्याचा धर्म आठवला. पण तो स्वत:शीच पुटपुटला, 'कुणास ठाऊक कसली केस आहे? ... कशाला या भानगडीत पडायचं.. ' व्यापाऱ्याकडे कानाडोळा करून वकीलही निघून गेला.

मग थोड्या वेळानं असाच रस्त्यानं जाणारा एक यात्री तिथं पोचला. जखमांच्या वेदनांमुळे कण्हत असलेला तो व्यापारी त्याच्याही दृष्टीला पडला. त्याला पाहताच यात्रीलाही आपला धर्म आठवला, कर्तव्याचे स्मरणही झाले. तो तत्काळ व्यापाऱ्याजवळ गेला. त्याला गोड बोलून धीर दिला. आपल्या घरी घेऊन आला. आपल्या घरी त्यानं जखमी व्यापाऱ्याची मन लावून चांगली सेवाशुश्रुषा केली. औषध-उपचार केले. काही दिवसांतच व्यापारी ठाकठीक झाला. यात्रीनं त्याला त्याच्या घरी सुखरूप पोचवलं.

पुजारी त्याच मंदिरात रहात होता, की जे मंदिर याच व्यापाऱ्यानं बांधलेलं होतं आणि वकीलदेखील त्या व्यापाऱ्याच्या शेजारीच राहात होता. पण हा यात्री या व्यापाऱ्याचा कुणीच नव्हता. नात्यागोत्यातला नव्हता. शेजारी-पाजारीदेखील नव्हता.''

ही गोष्ट सांगून झाल्यावर साधूनं वकीलमहाशयांना विचारलं, ''महाशय, आता आपणच सांगा त्या तिघांमध्ये व्यापाऱ्याचा खराखुरा सखासोबती कोण होता?'' वकीलमहाशय म्हणाले, ''खरं पाहिलं, तर यात्रीच त्या व्यापाऱ्याचा खराखुरा सखासोबती म्हणून सिद्ध झाला होता.''

साधू हसत हसत म्हणाला, ''ठीक आहे. आपण बरोबर सांगितलं. महाशय, ईश्वराचा खराखुरा सखासोबतीदेखील तोच असतो, की जो कठीण समयी दुसऱ्याच्या उपयोगी पडतो आणि महाशय, सगळ्यात मोठा उपदेश हाच आहे व मोक्षाचा मार्गदेखील हाच आहे!''

'जे का रंजले गांजले
त्यासी म्हणावे आपुले ।
तोचि साधू ओळखावा,
देव तेथेचि जाणावा ॥

या संत-वचनाची शिकवण साधूनं मोठ्या खुबीनं आणि कौशल्यानं वकीलमहाशयांना दिली होती.

दु:खितांची सेवा हाच सर्वांत मोठा धर्म आहे, हाच मोक्षाचा मार्ग आहे, हेदेखील सांगितलं होतं.

इतका सोपा, सरळ, पण मोठा उपदेश ऐकून वकीलमहाशय मनातून लज्जित झाले होते. कारण आयुष्यभर कायद्याचा काथ्याकूट करून देखील त्यांच्या लक्षात हे मर्म आले नव्हते. कधी आले असले, तरी त्यांनी ते पैशाच्या मोहाने दूर सारले होते. आज मात्र त्यांना साधूनं सांगितलेल्या गोष्टीतून हे कळून आले होते की, आपल्या व्यवसायातच मोक्षाचा मार्ग लपलेला आहे! आपला व्यवसाय आपण प्रांजलपणानं आणि सचोटीनं केला, तर तो लपलेला मार्ग आपला आपल्यालाच दिसू शकतो. त्यासाठी एखाद्या साधूकडं जाऊन वेगळा उपदेश घेण्याची गरज नसते!

✻ ✻

# मातीचा सुगंध

पंजाबमधल्या एका खेड्यातली ही कहाणी. जुनीपुराणी. पण तिथले लोक अजूनही तिची याद करतात. एकमेकांना सांगतात. बालबच्च्यांना ऐकवतात.

गावात एक पंजाबी किसान राहत होता. शेतीवाडी फुलवत होता. खूप मेहनत करत होता. त्याला होता एक मुलगा. त्याचं नाव होतं हंसपाल. हा तगडा तरूणदेखील मोठा कष्टाळू होता. मेहनती होता. सद्गुणी होता. सगळ्यांशी मिळून मिसळून वागायचा. हसून गोड बोलायचा.

परंतु एकदा, काय झालं कुणास ठाऊक, हंसपाल कुणात मिसळेनासा झाला. कोणाशी बोलेनासा झाला. गप्प गप्प राहू लागला. दिवसभर शेतात राबायचा आणि संध्याकाळ झाली की, गावापासून थोड्या अंतरावर असलेल्या पुराण्या हवेलीकडं जायचा.

गावाबाहेर फार प्राचीन काळातली एक पडकीशी हवेली होती. कोण्या राजाची ती होती, असं सांगतात. तिच्या गोष्टीही लोक बोलतात. पण आता ती हवेली होती लांब. एकटीच. पडकी, ढासळलेली.

हवेलीच्या मधोमध एक मोठी चौकोनी दगडी विहीर होती. हंसपाल संध्याकाळी विहिरीच्या पायरीवर जाऊन बसायचा आणि बासरी वाजवायचा. लहानपणापासूनच तो बासरी वाजवायला शिकला होता. फार छान बासरी वाजवायचा. निरनिराळ्या राग-रागिण्या बासरीवर आळवायचा. गावात घरोघर दिवेलागण व्हायची आणि इकडं हंसपालच्या बासरीतून मधुर सुरांची बाग फुलायची! हंसपाल रंगून जायचा, तल्लीन व्हायचा. इतका की तहान भुकेचीही त्याला आठवण राहायची नाही. वेळेचं भान उरायचं नाही. कधी कधी तर अर्धी रात्र संपून जायची, पण हंसपालची धून चढतीच राहयची!

हंसपालचं हे असं बदललेलं वागणं पाहून गावातल्या लोकांना नवल वाटू लागलं. ते एकमेकांत कुजबुजू लागले, ''हंसपालला काय झालंय?''

एकदा हंसपाल संध्याकाळच्या वेळी घोड्यावरून चालला होता. अंगात निळा कुडता होता. डोक्यावर पांढरा साफा होता. रस्त्यात खोडकर मित्रांनी त्याला गाठलं. त्याला जणू घेरलंच. रलिया नावाच्या मित्रानं घोड्याचा लगामच पकडला. मखना नावाच्या मित्रानं एक जुनी कहाणी सांगायला सुरुवात केली. ''एक भोळीभाळी माळीण होती... आठवते आहे ना ही कहाणी? तुझे आजोबा सांगत असत...''

थोडा वेळ हंसपालही कहाणी ऐकत थांबला. हसत राहिला. पण जसंजशी संध्याकाळ व्हायला लागली, तसतशी एक प्रकारची अस्वस्थता त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागली. त्याला तिथं मग थांबवेनासं झालं. त्याचं लक्ष उडालं. मित्रांना म्हणाला, ''थांबा, कोणीतरी बोलवतंय मला...''



आणि तो घोड्याला टाच मारून पुढं निघूनसुद्धा गेला!...

रलिया आणि मखना दोघांनाही नवल वाटलं! "हंसपाल पागल तर झाला नाही?" ते आपसात बोलू लागले.

हंसपाल ढासळत्या हवेलीत पोचला.

विहिरीच्या पायरीवर बसून बासरी वाजवू लागला. आज रोजच्यापेक्षा बासरीच्या सुरात एक अजब अशी वेगळीच सुरावट उमटू लागली होती. हंसपालची जणू समाधीच लागली. तो मन:पूत बासरी वाजवीत राहिला. खूप वेळ बासरीच्या सुरावटीवर झुलत राहिला. जेव्हा थांबला, तेव्हा त्याचे डोळे ओलावलेले होते!...

मग हंसपाल स्वत:शीच पुटपुटला, "त्या घटनेला आज तीन वर्षे झाली. अशानं तर मी पागलच होऊन जाईन."

तेवढ्यात कुठूनतरी एक आगळावेगळा असा उत्कट ओला सुगंध त्याला जाणवला! त्यापाठोपाठ विहिरीजवळच्या झाडांमधून कोणाच्या तरी हसण्याचा गोड आवाजही त्याच्या कानी आला. हसणे कसे मंजुळ खणखणीत होते. घुंगरासारखे! "कोण आहे?" हंसपालानं चमकून विचारलं. पण उत्तराऐवजी पुन्हा तसेच मंजुळ हसणे कानावर आले.

मग हंसपाल उठून उभा राहिला आणि आसपास निरखून पाहू लागला. मग मात्र त्याच्या कानावर तसेच मधुर शब्द आले, "जिच्या प्रतीक्षेत तू बसलेला आहेस हंसपाल, ती मीच आहे!" आणि सब्जपरी त्याच्यापुढं येऊन उभी राहिली! तीन वर्षांपूर्वी असंच अचानक दिसलेलं दृश्य हंसपालच्या डोळ्यापुढे तरळू लागलं! तीन वर्षांपूर्वी तो असाच हिंडत फिरत विहिरीजवळ आला होता आणि अशीच सब्जपरी भेटली होती. तीन वर्षं होऊन गेली तरी तिच्या लक्षात आपलं नाव अजून आहे. हंसपाल म्हणाला, 'सब्जपरी, या तीन वर्षांत मी किती सोसलं आहे...

एक एक दिवस कसा काढला आहे? .. आता तरी तू जाणार नाहीस ना मला सोडून? ..." "मी जाणते आहे तुझं दु:ख. दररोज संध्याकाळी - रात्री इथं विहिरीच्या पायरीवर बसून मी तुझ्या बासरीचे सूर ऐकत असते. मी तुझी कठोर परीक्षा घेतली. तू थोर कलावंत आणि मोठा माणूस आहेस! पण तरी देखील या धरतीवर मला राहता येणार नाही!"

"मग मी तुझ्याबरोबर परीलोकांत येतो. काय हरकत आहे?"

"हरकत तर नाही!.. असं कर, उद्या इथंच भेट. मी आमच्या परीराणीला विचारून तिची परवानगी घेऊन येते."

दुसऱ्या दिवशी सब्जपरी आली. तिच्याजवळ चंद्राच्या किरणांसारखे दोन चंदेरी पंख होते. पंख तिनं हंसपालच्या दोन्ही खांद्यांना बांधले. दोघं बरोबर उडत निघाले आणि थोडक्याच अवधीत परीलोकात पोचले.

सब्जपरी हंसपालला परीराणीकडं घेऊन गेली. परीलोकात नृत्य-संगीताचा उत्सव तर सततच चालू असतो. हंसपालच्या स्वागतासाठी आणखीनच रंगीत-संगीत कार्यक्रम झाला. हंसपाल खूष होऊन गेला!

कार्यक्रम संपल्यावर परीराणीनं 'अमर' फल मागवलं. त्याचा रस काढून हंसपालला दिला. म्हणाली, "हा रस घे. जोवर इथं राहशील, तोवर अमर होशील!"

रस पिऊन होताच हंसपालला आपल्या आतूनच काही तरी अद्‌भूत परिवर्तन घडून येत आहे, असा अनुभव आला. तो एका नवीन उत्कट आनंदानं, हर्षानं, चैतन्यानं फुलून गेला!...

दिवसांमागून दिवस चालले. हंसपाल आणि सब्जपरी सगळ्या परीलोकात सगळीकडं हिंडत फिरत राहायचे. नृत्यसंगीतात डुंबायचे. आनंदहर्षात बागडायचे... जीवनात कसलंच दु:ख नव्हतं. कशाचीच

उणीव नव्हती!...

पण त्या दोघांना असं बरोबर हिंडता फिरताना पाहून दुसऱ्या पऱ्यांच्या मनात मात्र ईर्ष्या उत्पन्न झाली. हेवा वाटू लागला. त्या आपसात कुजबुजू लागल्या. "जमिनीवरचा हा माणूस इथं कसा आला?... इथले नियम जर पाळले गेले नाहीत, तर आम्हा पऱ्यांना कोण विचारणार?"

कुजबुज वाढता वाढता परीराणीच्या कानापर्यंत पोचली. परीराणीनं तिकडं लक्ष दिलं नाही. तेव्हा सगळ्या पऱ्या मिळून राणीकडं गेल्या आणि आपला विरोध प्रकट करीत म्हणाल्या, "आपण हंसपालला अमर बनवलं, हे ठीक केलं नाहीत." त्यांना समजावत परीराणी म्हणाली, "जे घडायचं होतं ते घडून गेलं आहे. आता ते विसरून जा!"

"नाही नाही परीराणी, अशानं परीलोकाची शिस्त, व्यवस्था पार बिघडून जाईल."

"पण आता काय करायचं!"

"आपण हंसपालला अमर होण्याचं वरदान दिलं आहे ना! पण असं तर नाही सांगितलं की, आम्हा पऱ्यांप्रमाणे तो सदैव तरुण राहील! म्हातारा होणार नाही!"

"हां. मी तर त्याला केवळ अमर होण्याचं वरदान दिलं आहे!"

"ठीक आहे. पण त्याला सदैव तरुण राहाण्याचं वरदान मात्र देऊ नका. तो म्हातारा होईल आणि मग एके दिवशी कंटाळून इथून निघून जाईल."

ही गोष्ट हंसपाल आणि सब्जपरी यांच्याही कानावर गेली. परंतु त्यांनी त्याची पर्वा केली नाही.

हंसपाल आणि सब्जपरी काही वर्षं खूप आनंदात राहिले. ती दोघं दिवसभर डोंगरदऱ्यांतून फिरायची. पुष्पवाटिकेतून हिंडायची. पक्ष्यांची गाणी ऐकायची, हसायची, खेळायची, गोष्टी करायची, गाणी

म्हणायची... वर्षांमागून वर्षं गेली आणि मग अचानक फरक पडला! हंसपालचं शरीर, चेहरा आणि चाल यात बदल झाला. पूर्वीसारखा तो तरतरीत दिसेनासा झाला. तो लवकर थकू लागला. म्हातारपणच्या सुरकुत्या चेहऱ्यावर उमटू लागल्या. आता तर तो अनेक वेळा उदास-उदास दिसू लागला. कधी कधी पुटपुटायचा, "मी परीलोकांत कशासाठी आलो?" सब्जपरी दिलासा देताना त्याला म्हणायची, "तू असा विचार करू नकोस. मला तर तू पूर्वीसारखाच आवडतोस.!"

आणखी काही दिवस उलटले. म्हातारपणच्या सुरकुत्यांनी हंसपालचं सगळं शरीरच भरून गेलं. तो फार दुबळा, थकलेला दिसू लागला. चालताना त्याचे पाय लटपटू लागले. एके दिवशी तो सब्जपरीला म्हणाला, "आता मला एकट्याला राहू दे. तू दुःखी राहू नकोस".

परंतु सब्जपरी त्याला दिलासा द्यायची. धरून फिरायला न्यायची. निरनिराळ्या गोष्टी सांगायची. त्याचं मन रिझवायची. पण तरीही हंसपाल निराश व्हायचा. म्हणायचा, "परीलोकातील सुंदरता आता मला चांगली वाटत नाही. रुचत नाही. मला धरतीवर परत जाऊ दे!"

सब्जपरी म्हणायची, "तू उगाच विचार करतोस, वृद्धपणातही तू पूर्वीपेक्षा सुंदर दिसतोस. इथून तुला धरतीवर जाण्याची काय गरज आहे?"

इतकचं नव्हे तर ज्या पऱ्यांना हंसपाल परीलोकातून परत जावा असं आधी वाटायचं, त्यांनाच आता त्याच्या परतीच्या बोलण्यानं दुःख वाटू लागलं. एकदा त्या परीराणीकडं जाऊन म्हणाल्या, "हंसपाल परत तरुण होऊ शकणार नाही का?"

परीराणी म्हणाली, "नाईलाज आहे. आता हे माझ्या हाती राहिलेलं नाही."

एके दिवशी हंसपाल एकटाच फिरायला निघाला. जाणूनबुजूनच एक अनोळखी रस्ता तुडवू लागला. हा रस्ता परीलोकाच्या मागून जात होता. जाता जाता तो एका घनदाट जंगलात पोचला. तिथं त्याचं मन, एका विलक्षण अजब अशा सुगंधानं भरून गेलं! धुंद झालं!... हंसपाल जलद गतीनं पुढे जाऊ लागला. त्याच्या लक्षात आलं की हा सुगंध परीलोकातला नाही. पण याच सुगंधासाठी गेली अनेक वर्षं मी बेचैन होतो!

तो आणखीन पुढं जसजसा चालत गेला, तसतसा सुगंध त्याला अधिकच जाणवू लागला आणि आश्चर्य असं की, तो सुगंध खालच्या धरतीवरून येत होता. धरतीही आता लांब राहिलेली नव्हती. ती जवळच होती. हंसपालनं डोळे उघडून पाहिलं. लांबवर हिरवी हिरवी शेतं वाऱ्यावर डुलत होती. कुठं नांगरणी चालू होती. कुठं रोपणी चालू होती. धान्याचा आणि मातीचा सुगंध सगळीकडं पसरलेला होता...

हंसपालच्या डोळ्यांपुढं त्याचं सगळं बालपण तरळू लागलं. आजोबांच्या शेतात त्यानं जेव्हा हट्ट धरून पहिल्यांदा नांगर चालविला, तेव्हाही असाच मातीचा सुगंध जाणवला होता... मन भरून गेलं होतं... धुंद झालं होतं...

हंसपाल त्या धुंदीतच होता, तेवढ्यात पाचोळ्याचा आवाज आला. त्यानं मागं वळून पाहिलं. सगळ्या पऱ्या तिथं गोळा झाल्या होत्या. त्यांचे डोळे अश्रूंनी ओलावले होते.

परीराणी आपले डोळे पुशीत म्हणाली, ''हंसपाल, तुझ्या मनीचं दु:ख आम्हाला कळलं आहे. आता आम्ही तुला अडवणार नाही.''

सब्जपरी पुढं आली, तिनं हंसपालचा हात धरला आणि त्याला घेऊन ती धरतीवर आली. हंसपालला एका हिरव्यागार शेतात तिनं सोडलं आणि ती स्वत: पानावर चमकणारा दवबिंदू झाली.

हंसपाल हळूहळू पुढं निघाला. एका शेतात शेतकरी जमीन नांगरत होता. हंसपाल त्याला म्हणाला, "तू आता आराम कर. मी शेत नांगरतो." आजुबाजूच्या लोकांना नवल वाटलं. एवढा म्हातारा माणूस नांगर धरणार!... परंतु हंसपाल मात्र फार फार खुषीत होता. दिवसभर त्यानं मोठ्या उत्साहानं शेत नांगरलं. नांगरताना खुषीत गाणीही म्हटली.

हंसपाल तिथंच राहिला. त्यांच्यातलाच बनला. शेतातली कामधामं संपली म्हणजे जेवून-खाऊन रोज रात्री लहान मोठी सगळी माणसं हंसपालच्या भोवती जमू लागली. हंसपाल त्यांना रोज़ नवनवीन गोष्टी सांगू लागला. गाणी म्हणून दाखवू लागला. त्या गोष्टी आणि गाणी धरतीवरली आणि परी-लोकांतली असायची. लोकांना ती खूप खूप आवडायची...

हंसपालला जाऊन आता शेकडो वर्षं झाली. पण तरीही पंजाबी शेतकरी शेत नांगरताना त्याची गाणी आठवतात आणि मातीचा सुगंध मनात भरून, धुंद होऊन मुक्तपणानं गातात....

✵ ✵

# बाळ माझं छोटं...

गोष्ट आहे जुनी पुराणी. पण ऐकायवाचायला नवी तराणी. राजाराणीचे दिवस संपले. पण गोष्टीतले शहाणपण अजून टिकले.

तर अशाच एका गावात अशीच एक बाई रहात होती. नाव होतं सोनूबाई, पण हाती नव्हता कथलाचाही वाळा. गरीबीनं गांजलेली, दारिद्र्यानं पीडलेली. दारूड्या नवऱ्यानं त्रासलेली. वरिष्ठांकडून ग्रासलेली...

सोनाबाई मोलमजुरी करायची. चार ठिकाणी राबायची. कसंबसं जगायची. पोटच्या गोळ्याला जगवायची...

सोनाबाईला तान्हं बाळ होतं. होतं काळं-दुबळं. फाटकं ल्यालेलं. तुटकं पांघरलेलं. पण सोनाबाई पडली आई. तिचा जीव ओढ घेई. दुखलं खुपलं कासावीसं होई. पडलं रडलं धावून जाई. छातीशी धरून पटापट मुके घेई... बाळाला उगी करताना, समजवताना म्हणायची कशी, "बाळ माझं छोटं, राजाहून मोठं..."

आजूबाजूच्या आयाबाया ऐकायच्या. खुदखुदु हसायच्या. नाकतोंड वेंगाडायच्या. बापेगडी ऐकायचे. वाकडंतिकडं बोलायचे.

सोनाबाई ऐकायची, न ऐकल्यागत करायची. आपण भलं नि आपलं काम भलं. कामधाम झालं की बाळाला घ्यायची. सगळे कष्ट विसरायची. आनंदून जायची. आनंदानेच म्हणायची, "बाळ माझं छोटं... बाळ माझं छोटं... राजाहून मोठं..."

आयाबाया म्हणायच्या, "कुठं राजा मोठा न् कुठं हिचा छोट्या. काळा कसनुसा. राजानं ऐकलं तर वरात काढील गाढवावरनं."

बापेगडी म्हणायचे, "कुणीकडं त्यो राजा न् कुणीकडं ह्यो भजा! राजानं ऐकलं तर उलट्या पाठीवर कोरडेच ओढील."

सोनाबाईचं यावर एक नाही की दोन नाही. आपण भलं नि आपलं काम भलं. कामधाम झालं की बाळाला घ्यायची, सगळे कष्ट विसरायची, आनंदून जायची. आनंदानेच म्हणायची, "बाळ माझं छोटं... राजाहून मोठं... बाळ माझं छोटं राजाहून मोठं..."

आयाबाया वैतागल्या. एकमेकीत म्हणून लागल्या, "काय तरी बाई, मुलखावेगळी आई... राजानं ऐकलं तर धडगतच नाही..."

बापेगडी खवळले. एकमेकाला म्हणाले, "अशी बाई पाहिली नाही, अशी आई ऐकली नाही.. राजानं ऐकलं तर जिती जागती सोडायचा नाही.."

सोनाबाई ढिम्म्! तिचं गाणं सुरूच - "बाळं माझं छोटं.., राजाहून मोठं... बाळ माझं छोटं.. राजाहून मोठं..."

होता होता तसंच झालं. राजाच्या कानावर सोनाबाईचं गाणं गेलं. - "बाळ माझं छोटं... राजाहून मोठं..."

राजा संतापला. रागावला. ओरडून म्हणाला, "कोण असं म्हणतंय? कोण असं गातंय? माझ्याहून मोठं - ते चिमुरडं छोटं?"

"हां हां, महाराज! तुमच्याहून मोठं, ते चिमुरडं छोटं!" राजाचे कानफुंके म्हणाले. राजाचे तोंडपुजे म्हणाले.

"कोण म्हणतंय असं?" राजा पुन्हा गरजला.

"सोनाबाई"

"असं! शिपाई पाठवा, जलदी करा. सोनाबाईला हाजिर करा!" राजानं हुकूम दिला.

लगोलग शिपाई गेला.

आयाबाया घाबरल्या.

बापेगडी भेदरले.

सोनाबाई मात्र शांत-शांत!

चटकन् उठली. बाळाला घेतलं नि राजाला भेटली.

‘‘महाराजांना दंडवत घालते. महाराजांना आयुष्य मागते.’’ सोनाबाई म्हणाली.

राजानं विचारलं, ‘‘सोनाबाई, आमच्या कानी विपरित आलं. खरं-खोटं करणं झालं म्हणून इथं बोलावणं केलं.

‘‘बाई गं! तू आपल्या छोट्याला माझ्याहून मोठा म्हणतेस?’’

‘‘होय महाराज!’’

‘‘म्हणजे आम्ही जे ऐकलं ते खरंच म्हणायचं?’’

‘‘होय महाराज! बाळ माझं छोटं, राजाहून मोठं..’’

सोनाबाई म्हणाली. राजाच्या तोंडावरच म्हणाली.

राजा चमकला!

ऐकणारे हादरले!

धडधडीत राजाच्या तोंडावर... राजाचा अपमान...

पण राजानं धीरानं घेतलं. म्हणाला,

‘‘सोनाबाई, हे गं कसं? बाळ तुझं छोटं, माझ्याहून मोठं! हे गं कसं?’’

‘‘सांगते महाराज.’’

‘‘सांग, सांग. ऐकू दे तरी.’’

‘‘महाराज, थाळीभर रसरशीत निखारे आणवा!’’

‘‘निखारे?’’

‘‘हां, काळा विषारी नागही बोलवा!’’

‘‘नाग?’’

‘‘हां महाराज!’’

राजानं लागलीच हुकूम सोडला. निखारे आले. नागही आणवला.

“सोनाबाई, आता सांग.”

“महाराज, आणखी एक प्रार्थना आहे.”

“ती कोणती?”

“मूठभर निखारे हाती घेईल असा, नागाच्या फडीला हाती धरील असा, दरबारातला शूरवीर तुम्ही बोलवा -!”

हे ऐकलं नि राजा गप्प! दरबार गप्प! कोणीच बोलेना. कोणीच उठेना.

सोनाबाई म्हणाली, “महाराजांच्या दरबारी असा वीर नाही, तर महाराजांनीच पुढं यावं.”

राजाला भीतीनं घाम फुटला. गळ्यातल्या गळ्यात शब्द आटला.

“का महाराज, येत नाही पुढं?”

“सोनाबाई, निखारा धरून कोण भाजून घेईल? नागाला पकडून कोण मरून जाईल?”

“ज्याला कसली भीती नाही, ज्याची नीती शुद्ध आहे, तोच महाराज पुढं येईल.”

“असा वीर कोण आहे?” राजानं विचारलं.

“माझं चिमुकलं, छकुलं, महाराज!” सोनाबाई म्हणाली. बाळाला पुढं केलं. इवल्या इवल्या मुठी उघडून बाळ धावलं. निखारा धरायला.

सोनाबाईनं आवरलं, तसं बाळानं झेप घेतली नागोबांच्या दिशेनं.

“सोनाबाई, सोनाबाई आवर आवर बाळाला.” राजाच म्हणाला.

सोनाबाई हसली. बाळाचा मुका घेत म्हणाली,

‘‘बघा बघा महाराज, आपण भेदरून गेलात. पण बाळ माझं छोटं तुमच्याहून मोठं - आहे की नाही खरं?’’

‘‘खरं आहे सोनाबाई. बाळ तुझं छोटं, माझ्याहून मोठं!’’

राजानं सोनाबाईची सोन्यारुपानं ओटी भरली. साडीचोळी ल्यायला दिली. अंगडी कुंचडीनं बाळाला नटवलं. बाळलेण्यांनी सजवून टाकलं.

सोनाबाई हरखून गेली.

सोनाबाई आनंदून गेली.

आनंदानंच म्हणू लागली, ‘‘बाळ माझं छोटं.. राजाहून मोठं.. बाळ माझं छोटं.. राजाहून मोठं...’’

❋ ❋

# मोलाचा उपदेश

गोष्ट आहे जुन्या काळातली. प्रण नव्या काळातही वाचण्यासारखी. जमले तर वागण्यासारखी.

कोण्या एका आटपाट नगरात एक ब्राह्मण आणि एक ब्राह्मणी राहात होती. खाऊन पिऊन सुखी होती. आनंदाने दिवस कंठीत होती.

ब्राह्मण मोठा विद्वान होता. पंडित होता. शास्त्री होता. त्याला सगळीकडे मानमान्यता होती. त्याचा आदरसत्कार होत होता.

विद्वान सगळीकडे पूजनीयच असतो.

ब्राह्मणाला एक मुलगा होता. तोही आपल्या वडिलांसारखाच बुद्धिमान होता. अत्यंत हुशार होता. ब्राह्मण आपल्या मुलाला बालपणापासून शिकवीत होता. तो जे सांगायचा, ते ज्ञान मुलगा चटकन् ग्रहण करायचा. पुन्हा त्याला ते सांगण्याची पाळी कधी यायची नाही. आपल्या मुलाची अशी तीक्ष्ण बुद्धी पाहून ब्राह्मणाला फार फार समाधान वाटायचे. तो मनोमनी आनंदून जायचा. प्रसन्न व्हायचा.

परंतु हा आपला आनंद किंवा समाधान तो मुलापुढे कधीच, चुकूनसुद्धा, दाखवायचा नाही. कधी त्याच्या हुशारीची तारीफ करायचा नाही. त्याला भले म्हणायचा नाही, की कधी शाबासकी द्यायचा नाही! उलट, तो आपल्या मुलावर सदान्कदा डाफरत राहायचा; धमकावत राहायचा; निंदा करायचा.

दिवसांमागून दिवस गेले. वर्षे गेली...

मुलाचे शिक्षण पूर्ण झाले. मुलगा मोठा झाला. शास्त्रीपंडित म्हणून तोही मिरवू लागला. आपली विद्वत्ता प्रकट करू लागला. त्याच्या बुद्धिचातुर्याची प्रशंसा दूरवर पसरली. लोकांत त्याला मानसन्मान मिळू

लागला. आदरसत्कार होऊ लागला. त्याचे सखोल ज्ञान पाहून, याच्यासारखा पंडित दुसरा नाही, अशीच लोकांची खात्री झाली.

पण, इतके सगळे होऊनदेखील ब्राह्मणाने मात्र मुलाच्या बाबतीतले आपले वर्तन काही बदलले नाही. तो त्याला तसेच बोलत राहिला. एवढा मोठा तो पंडित; पण ब्राह्मण त्याला लहानलहानशा गोष्टीवरून बोलत असे; त्याची अक्कल काढत असे; त्याचा अपमान करीत असे.

काही दिवसांनी मुलाचा विवाह झाला; ब्राह्मणाला सून आली. मुलाचा मानसन्मान आणखी वाढला; पण बापाला मात्र त्याच्या गुणांची जणू काही कदरच नाही, असेच वर्तन चालू राहिले.

आपल्या बापाचे हे असे वागणे मुलाला पहिल्यापासूनच खटकत असे; पण ते आता जास्तीच खटकू लागले.

मुलाला वाटायचे, "मी एवढा मोठा झालो. विवाहित झालो; विद्वान झालो; भल्या मार्गाने मी चालतो; लोकांत माझी वाहवा होते; मला मानसन्मान मिळतो. पण, घरात वडील मात्र सदान्‌कदा माझे दोषच काढीत बसतात! पदोपदी माझा अपमान करतात. मला वाट्टेल तसे टाकून बोलतात... माझ्या विद्वत्तेचा, मला लोकांत मिळणाऱ्या आदरसत्काराचा ह्यांना मत्सर तर वाटत नसेल?"

आणखी काही दिवस असेच गेले.

बापाचे वागणे तसेच राहिले. बोलणे तसेच राहिले. मुलाच्या मनात वडिलांविषयी कटुतेची भावना आणखी वाढीला लागली. त्याला वडिलांचा राग-संताप येऊ लागला. वाढता वाढता क्रोधाचे भूत त्याच्या मानगुटीवर बसले. त्याने मग एके दिवशी क्रोधाच्या भरात आपल्या वडिलांना मारून टाकण्याचाच निश्चय केला.

नकोच ही कटकट!

शरद ऋतूचे दिवस होते. अश्विनाचा महिना होता. शुक्ल पक्षातील शुभ्र चांदणे पडलेले होते.

अर्ध्या रात्री मुलगा उठला आणि वरच्या मजल्यावरच्या वडिलांना मारण्यासाठी म्हणून जिन्याच्या पायऱ्या चढू लागला. हातात तीक्ष्ण शस्त्र होते. मनात भयंकर क्रोध होता. जिन्याच्या शेवटच्या पायरीवर तो आला. खोलीच्या बाहेर उभा राहिला, तर आतून आईवडिलांच्या बोलण्याचा आवाज त्याच्या कानी आला. ती दोघे जागीच होती. खिडकीतून चांदणे आत येत होते. मुलाने कान टवकारले, श्वास रोखले आणि त्यांचे बोलणे ऐकू लागला.

आई म्हणत होती, ''बघा, आजचा चंद्र कसा सुंदर दिसतो आहे! आज पौर्णिमाच आहे. चंद्राच्या शीतल चांदण्याने सगळी सृष्टी कशी सुंदर दिसत आहे. अमृताने न्हात आहे. या पृथ्वीवर या चंद्रासारखा उज्ज्वल कीर्तिमान दुसरा कोणी नसेल!''

ब्राह्मण म्हणाला, ''का नाही?''

''दुसरा कोण आहे?''

''लांब कशाला जायला हवे? आपल्या लाडक्या लेकाकडेच पहा!''

''खरेच?''

''अगं, या चंद्राच्या चांदण्यांहूनदेखील अधिक असा त्याच्या विद्येचा आणि ज्ञानाचा प्रकाश सर्व जगभर पसरला आहे. चंद्राला प्रकाश आहे; पण सुगंध नाही. तुझ्या मुलाच्या विद्येच्या प्रकाशाला सद्‌गुणांच्या सुगंधाची जोड आहे. त्याचे वर्तन अमृतासारखेच गोड आहे. सगळ्यांना सुखसमाधान देणारे आहे. आनंदित करणारे आहे. त्याच्या यशाच्या पुढे चंद्रदेखील फिका आहे! अशा गुणवान मुलाला जन्म दिल्याबद्दल आपण आपल्याला धन्य धन्य मानले पाहिजे.''

वडिलांच्या तोंडचे हे शब्द ऐकताच मुलाला आश्चर्य वाटले! तो जागच्या जागी चकित होऊन खिळूनच राहिला.

पित्याचे ते दर्शन त्याला नवीनच होते!

तो आपल्या मनाशी पुटपुटला, "बापरे! मी केवढ्या काळोखात वावरत होतो; अंधारात जगत होतो. आज माझ्या हातून केवढा अनर्थ घडणार होता! केवढे मोठे पाप होणार होते!"

मुलगा लज्जित झाला. शरमून गेला. हलक्या पावलाने जिना उतरून खाली आला. बिछान्यावर पडला; पण त्या रात्री त्याला मुळीच झोप आली नाही.

दुसरा दिवस उजाडला.

मुलाने उठून स्नान वगैरे आटोपले आणि तो आपल्या वडिलांच्या पुढे जाऊन उभा राहिला.

ब्राह्मणाने नेहमीप्रमाणे त्याच्याकडे क्रुद्ध नजरेने पाहिले आणि विचारले, "काय रे?"

"बाबा, मला आपल्याला काही विचारायचे आहे?"

"काय विचारायचे आहे?"

"बाबा, जर एखाद्या मुलाने आपल्या वडिलांना ठार करायचे ठरविले; पण पुन्हा विचार बदलला आणि वडिलांना ठार केले नाही, तर त्याने कोणते प्रायश्चित्त घेतले पाहिजे?"

"यासाठी शास्त्रात दोन तऱ्हेची प्रायश्चित्ते सांगितलेली आहेत: एक म्हणजे, अशा माणसाने पिंपळाच्या झाडावर चढून बसायचे आणि खालून पिंपळाचे झाड पेटवून द्यायचे व झाडाबरोबर जळून जायचे. दुसरे म्हणजे, एखाद्या चांगल्या भल्या ब्राह्मणाच्या गायी बारा वर्षे निःस्वार्थ भावनेने राखायच्या. त्यांना चारा-पाणी देऊन त्यांची सेवा करायची. तनमनाने कष्टायचे."

वडिलांनी सांगितलेली प्रायश्चित्ते मुलाने ऐकून घेतली. मनाशी खूप विचार केला. मग एक निश्चय करून आपल्या पत्नीला म्हणाला, "मी बारा वर्षे प्रायश्चित्त घेण्यासाठी परदेशी जात आहे. खर्चासाठी मला बारा हजार रुपयांची जरुरी आहे. त्यासाठी मी एक कागद लिहून तुझ्याजवळ देतो. तू तो कागद घेऊन गावातील धनपतीशेठजींकडे जा. कागद त्यांच्याकडे गहाण ठेव आणि पैसे घे."

पतीच्या सांगण्याप्रमाणे पत्नी धनपतीशेठजींच्या घरी गेली. तो कागद त्यांना दिला. तिच्या पतीबद्दल त्यांच्या मनात परम आदराची भावना वसत होतीच. त्यांनी लागलीच बारा हजार रुपये तिच्या स्वाधीन केले. ती पैसे घेऊन गेल्यावर शेठजींनी कागदाची घडी उलगडली. त्यावर लिहिले होते:

"उताविळीने काम बिघडते,
धीराने काम सुरळीत होते!"

शेठजीने हा कागद आपल्या पलंगाजवळच्याच तिजोरीवर चिटकवून टाकला.

ब्राह्मणाच्या मुलाने त्या बारा हजार रुपयातील सहा हजार रुपये आपल्या वडिलांना दिले आणि सांगितले, "प्रायश्चित्त घेण्यासाठी मी बारा वर्षे वनवासात चाललो आहे. आपण आपला खर्च तोवर या पैशातून चालवावा."

बाकीचे सहा हजार रुपये घेऊन तो घरातून बाहेर पडला.

जाता जाता तो बराच लांब गेला. गंगेच्या काठी पोचला. तिथे एका तपस्वी ब्राह्मणाचा आश्रम त्याला दिसला. आश्रमात बऱ्याच गायीही होत्या.

मुलाने ठरविले, "इथेच राहायचे आणि या गाईंची राखण करायची, सेवा करायची."

तो तिथे राहिला. आपल्या पदरचे खायचा आणि रात्रंदिवस गायींची सेवा करायचा. त्यांना वेळच्या वेळी चारापाणी द्यायचा. त्यांना स्वच्छ धुऊन काढायचा. रानात चरायला न्यायचा. त्यांचा गोठा स्वच्छ ठेवायचा. त्यांची धार काढायचा. मायेने त्यांच्या अंगावरून हात फिरवायचा. त्यांच्या वासरांची देखभाल करायचा... अशी सगळी कामे तो अगदी मनापासून भक्तिभावाने करायचा...

ज्या दिवशी हा मुलगा असा घराबाहेर पडला, त्याच दिवशी धनपतीशेठदेखील व्यापारासाठी समुद्रपार करून एका देशाला गेला.

ते गेले, त्यावेळी त्यांची पत्नी गरोदर होती. शेठजी परदेशात व्यापाराच्या व्यापात इतके गुंतून गेले की, बारा वर्षे ते घरी परत आलेच नाहीत!

ते घरी परतले, त्यावेळी त्यांचा मुलगाही बारा वर्षांचा झाला होता. चांगला धट्टाकट्टा होता. मोठ्या हाडांचा थोराड होता. त्यामुळे तो बारा वर्षांचा असूनदेखील अठरा वर्षांच्या मुलासारखा दिसत असे.

एकदा मुलाला बरे नव्हते. तो आपल्या आईबरोबर पलंगावर झोपलेला होता. दोघांनाही गाढ झोप लागली होती. त्याच वेळी मध्यरात्री शेठजी परदेशातून आपल्या घरी पोचले.

त्यांनी ते दृश्य पाहिले आणि त्यांचा संताप अनावर झाला.

संतापाच्या भरात त्यांनी खुंटीवर टांगलेल्या म्यानातून तलवार उपसली. तरवारीने त्या दोघांचे तुकडे करणार, इतक्यात त्यांची दृष्टी तिजोरीवर चिटकविलेल्या कागदावर पडली. त्यावर लिहिले होते:

"उताविळीने काम बिघडते,
धीराने काम [illegible]लीत होते!"

हे वाचताच शेठजीने हात मागे घेतला आणि तरवार म्यान क[illegible]

शेठजी मनाशी विचार करू लागले, "पंडितजींचा हा उपदेश

सांगतो की, कुठलेही काम समजून-उमजून केले पाहिजे; नाही तर नंतर पश्चात्ताप करावा लागतो. पंडितजींची ही शिकवण मानली पाहिजे.''

संताप आवरून शेठजींनी शांतपणे आपल्या पत्नीला उठवून विचारले, ''हा कोण आहे?''

पत्नी आनंदाने म्हणाली: ''अहो, हा आपलाच मुलगा आहे. आपण गेल्यानंतर याचा जन्म झाला. आता तो चांगला बारा वर्षांचा झाला आहे. आज त्याला थोडे बरे नव्हते म्हणून तो इथे मजजवळ झोपला आहे.''

नंतर तिने आपल्या मुलाला उठविले.

त्याला म्हणाली, ''बेटा, ऊठ! तुझे वडील परदेशाहून आले आहेत. त्यांना नमस्कार कर.''

मुलगा उठला. आपल्या पित्याच्या पाया पडण्यासाठी खाली वाकला, तर शेठजींनी त्याला आपल्या हृदयाशी धरले! शेठजींच्या आनंदाला पारावार उरला नाही.

शेठजी मनाशी म्हणाले, ''पंडितजींच्या उपदेशाने आज मला केवढ्या अनर्थापासून वाचविले आहे! उतावळेपणाने मी सर्वनाशच करीत होतो.''

त्यांनी मनोमन ईश्वराला धन्यवाद दिले आणि पंडितजींच्या शहाणपणाची स्तुती केली...

इकडे पंडितजीही, बारा वर्षांचा वनवास संपवून, घरी परतले होते. काही दिवसांतच त्यांनी शेठजींचे पैसे व्याजासह परत करण्यासाठी आपल्या पत्नीला पाठविले. त्याचबरोबर, आपण दिलेला कागदही परत आणण्यास सांगितले.

पंडितजींची पत्नी शेठजींच्या घरी गेली.

म्हणाली, ''शेठजी, हिशेब करून व्याजासहित आपली रक्कम

परत घ्या आणि मी दिलेला कागद परत द्या."

शेठजी म्हणाले, "मुली, मला पंडितजींकडून माझ्या व्याज-मुद्दलांपेक्षा कितीतरी पटींनी अधिक मिळालेले आहे. म्हणून तू हे पैसे परत घेऊन जा. हां, तुझा कागद मात्र मी परत देणार नाही! त्याची किंमत करता येणार नाही; पण त्याबद्दल हे एक लाख रुपये घेऊन जा!"

परंतु मुलीने ती रक्कम घेतली नाही! ती तशीच घरी परतली.

शेठजींनी मग ती रक्कम स्वत:हूनच पंडितजींना घरी नेऊन दिली.

शेठजींनी नंतर कागदावरचा तो उपदेश सोनेरी अक्षरात लिहून घेतला :

"उताविळीने काम बिघडते,
धीराने काम सुरळीत होते!"

❋ ❋

म. पं. सं. ठाणे,
क्र. 3583 26/8/99
विषय बा/०वा

# ससुल्या

असंच एक हिरवंगार देखणं अरण्य होतं. अरण्यात पुष्कळ झाडंझुडं होती. तशीच पशु-पक्षी यांनी गजबजलेली प्राणीसृष्टीही होती. हिरव्यागार गवताच्या कुरणात एक ससुल्या राहात होता. ससुल्या पांढराशुभ्र कापसाच्या गोळ्यासारखा, उंच कानांचा आणि टुळुटुळू डोळ्यांचा छोटासा ससा होता. ससुल्या छोटा होता म्हणून त्याची आई सदैव त्याच्या मागंमागं असायची. ससुल्या हिरव्यागार गवताच्या गालीच्यावर टुणटुण पळायचा. उड्या मारायचा.

एके दिवशी ससुल्यानं आईला विचारलं, "आई, माझा दादा, ताई कुठं आहेत?"

आईनं प्रेमळ नजरेनं ससुल्याकडं नुसतं पाहिलं. ती बोलली मात्र काही नाही. ससुल्याला वाटलं, आईनं ऐकलंच नसावं. म्हणून थोड्या वेळानं त्यानं तसंच पुन्हा विचारलं. आई बोलली नाही. पण ससुल्यानं पुन: पुन: विचारलं, "माझा दादा, ताई कुठं आहेत?"

मग आईला सांगणं भागच पडलं. ती म्हणाली, "तुझी भावंडं हरवलीत. कुठं गेलीत कुणास ठाऊक?"

ससुल्याला नवल वाटलं. त्यानं विचारलं, "आई, मग ती कधी परत येतील?"

"कधीच नाहीत," आई कापऱ्या स्वरात म्हणाली.

आईचं बोलणं ससुल्याला समजलंच नाही. पटकन् तो म्हणाला, "मी पण एके दिवशी निघून जाईन!"

ससुल्याचं हे बोलणं ऐकून आईचं काळीज थरारलं! कापऱ्या स्वरात ती म्हणाली, "असं बोलू नकोस बाळ. तू माझ्याबरोबरच

राहशील. पण सदैव सावध रहा, जागं रहा. बाहेर कुठं जायचं झालं, तर सगळीकडं निरखून पाहा. कुठं कसला धोका नाहीना, याची खात्री करून घे, आणि बरं का, कुठं जराशीदेखील चाहूल लागली किंवा खसफ़स आढळली, तरी ताबडतोब वेगानं धावत ये!''

"आई, मी तर नेहमीच सावध असतो. पळतोदेखील सुसाट. बघ की!...'' असं म्हणून ससुल्या खरंच धावत सुटला. हिरव्या गवतावरून जोरानं पळू लागला. पळताना तो फार खूष होता. फार आनंदात होता.

गवताच्या गालिच्यावर इकडं-तिकडं आणखीही काही ससे खेळत-बागडत होते. ससुल्याची आई एका बाजूला बसून त्यांच्याकडं कौतुकानं पाहात होती. तिचं मन वात्सल्यानं भरून आलं होतं. पण थोड्याच वेळानं ती उदास बनली. आपल्याच मनाशी पुटपुटली, "ससुल्याला मी किती जरी सांभाळलं, त्याच्यावर लक्ष ठेवलं तरी एक ना एक दिवस तो मला सोडून जाणारच. सगळ्याच आयांच्या नशिबी हे असतं. आमची सशांची पोरं तर मोठी झाल्यावर आमच्याबरोबर कधीच राहात नाहीत. ज्या दिवशी आमची गरज संपते, त्याच दिवशी ती आम्हाला सोडून जातात...''

झुंजूमुंजू झालं होतं. अंधार संपून दिवस उगवायला आला होता. पक्षी जागे झाले होते. कुलूकुलू बोलू लागले होते. थंडगार वारा वाहत होता. ससुल्याही लवकर उठून हिरव्या मैदानावर पळत होता. उड्या मारीत होता. सकाळचं दवात भिजलेलं मऊमऊ गवत मजेशीर वाटत होतं. गुदगुल्या करीत होतं. ससुल्या पळत होता... पळता पळता त्याला आईची आठवण झाली. ससुल्या मागं फिरून पळू लागला. आईला बघू लागला. पण आई कुठंच दिसत नव्हती. ससुल्यानं वेलींच्या जाळीत जाऊन पाहिलं. झाडांच्या बुंध्यांशी जाऊन बघितलं. उंच गवताच्या कुरणातून शोधलं, पण आई कुठंच दिसली नाही. ससुल्या खिन्न झाला. एका

झाडाखाली गप्प गप्प होऊन थांबला. तेवढ्यात आणखी काही सशांची पिलं दुडुदुडु पळत आणि टुणटुण उड्या मारत तिथंच आली. तीदेखील एकेकटीच होती. त्यांच्याबरोबर त्यांची आई नव्हती. ससुल्या त्या मित्रांबरोबर खेळू लागला. बागडू लागला. त्या सवंगड्यांतही दिपुलीशी त्याची मैत्री दाट जमली. ससुल्या आणि दिपुली बहुतेक वेळ एकत्र असायचे. खेळायचे, पळायचे, गप्पागोष्टी करायचे. ससुल्या खुष होता! त्याला वाटायचं, ही दुनिया केवळ खेळण्याबागडण्यासाठी आणि मनोरंजनासाठीच बनवलेली आहे.

परंतु एके दिवशी काय झालं, असाच एक छोटासा ससा भटकत-फिरत हिरवळीवरून चालला होता. मजेत होता. तेवढ्यावरून एक घार उडत आली आणि तिनं त्या लहानग्या सशाला चोचीत धरुन उचलून नेलं.


ते पाहून ससुल्या घाबरून गेला!

असंच एकदा एका रानटी कुत्र्यानं एका सशाला मारतानाही त्यानं पाहिलं. ससुल्या फारच घाबरून गेला! त्याला आईची आठवण झाली. ती त्याला नेहमी सांगायची, ''बाळा ससुल्या, या अरण्यातील सगळे मोठे पशू आपल्यासारख्या लहानशा प्राण्यांची शिकार करीत असतात. म्हणून तू सतत सावध असलं पाहिजे!''

एक दिवस ससुल्या दाट झाडीतून फिरत होता. फिरता फिरता त्याला कुणाच्या तरी पावलांची चाहूल लागली. तो जागच्याजागी थबकून राहिला. भेदरून आडून पाहू लागला. समोरून एक माणस येत होता. या दोन पायांच्या प्राण्यांबद्दल ससुल्यानं बऱ्याच भितीदायक गोष्टी ऐकलेल्या होत्या. त्याच्याजवळ म्हणे कसल्या तरी काड्या असतात. त्यांनी तो आग लावतो. मोठा जाळ होतो. धूरच धूर पसरतो. अरण्याला वणवा लागतो. त्यात बरीच जनावरं जळून जातात... आजसुद्धा तसंच होईल की काय?... ससल्या भेदरून विचार करीत राहिला. समोरून

येणाऱ्या माणसाकडं टक लावून पाहात बसला, पण त्याला हे ठाऊक नव्हतं की त्याच वेळी एक लांडगा त्याच्यावर टपून बसला आहे. ससुल्या असा बेसावध बघून लांडग्यानं त्याच्यावर झडप घातली. पण ससुल्या चपळाईनं सुटला. तीरासारखा सुसाट पळत निघाला. पण पुढं तो दोन पायांचा प्राणी होताच. मागं आणि पुढं दोन्ही बाजूंनी धोका निर्माण झाला होता. कुठल्या बाजूनं धावत जावं, हेच त्याला कळेनासं झालं. मागून लांडगा झेपावत होता. ससुल्याच्या अगदी जवळ आला होता. तेवढ्यात धाडकन् जोराचा आवाज झाला आणि लांडगा जमिनीवर कोसळला. 'शिकारी माणसाच्या बंदुकीनं लांडग्याला लोळवलं होतं.

खरं म्हणजे शिकारी माणसानं ससुल्याला बघितलं नव्हतं. पण ससुल्याला मात्र वाटलं, की त्या दोन पायाच्या प्राण्यानं आपल्याला जाणूनबुजून सोडून दिलं आहे. ससुल्या मनाशी पुटपुटला, "म्हणजे आपण ऐकलं होतं तेवढा काही हा दोन पायांचा प्राणी धोकेबाज, वाईट



नसतो तर!''

पण थोड्याच वेळात ससुल्याचा हा भ्रम वितळून गेला. शिकाऱ्यानं एका निष्पाप, निर्दोष हरिणाचा बळी घेतला होता!

शिकारी पाठमोरा झाला. तसा ससुल्या तिथून निसटला. पळत, पळत आपल्या दोस्तांकडं गेला. दोस्तांनी विचारलं, ''कुठं होतास इतका वेळ? केव्हापासून आम्ही तुला शोधीत आहोत!''

ससुल्याला दोस्तांची फिरकी घ्यावीशी वाटली. गर्वानं कान हलवीत तो म्हणाला, ''आज फार मोठी घटना घडली.''

यावर सगळ्या दोस्तांनी, 'कसली? कसली?' म्हणून कुतूहलानं विचारलं. ससुल्यानं मग तिखटमीठ लावून सांगितलं, ''मी एका ठिकाणी बसून विचार करीत होतो. कुठून कोणास ठाऊक एक लांडगा आला आणि त्यानं माझ्यावर झडप घातली.''

''लांडग्यानं? बापरे! खरं म्हणतोस! अरे मग तू कसा वाचलास? लांडगा म्हणजे तर आपला शत्रू!'' लाल्या नावाच्या सशानं विचारलं.

मी लांडग्याला झुकांडी दिली आणि पळत सुटलो. आता माझं पळणं ते! तो लांडगा काय माझ्याइतका पळणार?'' गर्वानं ससुल्या म्हणाला. सगळ्या दोस्त सशांनी ससुल्याकडं अभिमानानं पाहिलं. पण ससुल्याची बढाई फार वेळ टिकली नाही. त्याच वेळी गोल्या नावाचा एक ससा तिथं उपटला. तो म्हणाला, ''ससुल्या, जादा गप्पा मारू नकोस. मी पाहिलं सगळं. शिकाऱ्यानं बंदूक चालवून लांडग्याला लोळवलं नसतं, तर तू काही वाचला नसतास!''

ससुल्या गप्पगार झाला. काही बोलला नाही. हळूहळू सगळी दोस्त मंडळी तिथून पसार झाली. दिपुली मात्र तिथेच बसली होती. ती म्हणाली, ''ससुल्या, अरे असा ओशाळून काय बसतोस? मला ठाऊक आहे त्या गोल्याची बहादुरी! एकदम डरपोक आहे तो. भित्रा कुठला!''

दिपुलीच्या बोलण्यानं ससुल्याला हिंमत आली. दिपुली खरोखरीच त्याची चांगली भली मैत्रिण होती!

ऋतू बदलला. पावसाळा सुरू झाला. सगळ्या अरण्यात पाणीच पाणी झालं. सशांच्या परिवारातली सगळीजणं भिजून चिंब झाली. ओल्या अंगानं चिखलातून पळणं कठीण झालं. म्हणून मग सगळीजणं एका ठिकाणी जाऊन बसली. बसल्या बसल्या आपापल्या अनुभवाच्या गोष्टी सांगू लागली. बोलण्या बोलण्यातून चकमक उडाली. गरमागरम चर्चा सुरू झाली. बघता बघता भांडण जुंपलं. त्याच वेळी एक हरिण तिथं आलं. हरिणानं गुपचुप उभं राहून त्यांचं बोलणं ऐकलं. मग ते हरिण आवाज चढवून जोरानं त्यांना म्हणालं, "किती भांडखोर आपण! जेव्हा जेव्हा एकत्र येतो, तेव्हा तेव्हा भांडत बसतो."

हरिण निघून गेलं. सगळे ससे गुपचुप झाले. सगळ्यांना वाटलं, "हरिणानं बरोबर सांगितलं."

एके दिवशी दिपुली आणि ससुल्या भटकत चालले होते. तेवढ्यात ससुल्यानं दोन पायांच्या प्राण्यांची चाहूल ऐकली. आणि तो एक प्राणी नव्हता, अनेक होते!

काही मुलं अरण्यात फिरण्यासाठी आली होती. हसत खेळत गाणी म्हणत पानंफुलं तोडत ती मजेत चालली होती. त्याना बघताच सगळे ससे ताबडतोब इकडं तिकडं धावले आणि दडून बसले. पण बिट्ट्या पळाला नाही. तिथंच थांबला. एका मुलीनं त्याला पाहिलं आणि पुढे होऊन त्याचे कान पकडले. बिट्ट्याला उचलून छातीशी घेतलं. त्याच्या मऊ, पांढऱ्याशुभ्र अंगावरून हलकासा हात फिरवीत ती आपल्या मैत्रिणींना म्हणाली, "बघा बघा, किती सुंदर ससा पकडलाय मी!"

बिट्ट्यानं भेदरून डोळ्यांची उघडझाप केली. पाय हलवले. पण त्या मुलीनं त्याला घट्ट धरून ठेवलं होतं. मग तर तिनं त्याला एका

जाळीच्या पिशवीत ठेवून दिलं. बिट्ट्यानं तिथूनही सुटायचा प्रयत्न केला, पण मुलीनं पिशवीचं तोंडदेखील घट्ट बांधून ठेवलं होतं. जंगलात बराच वेळ भटकल्यावर ती सगळी मुलं घरी परतली. मुलीनं बिट्ट्याची पिशवी हातात घेतली होती. चालताना ती हलत-डुलत होती. बिट्ट्याला पाळण्यात बसल्यासारखं वाटत होतं. मुलीनं त्याला आपल्या घरी नेलं,आणि एका भल्या मोठ्या जाळीच्या पिंजऱ्यात ठेवून दिलं. त्याला हिरवं - कोवळं गवत, बटाटे, गाजरं, काकडी पुष्कळ पुष्कळ खायलाही दिलं. पाण्याचा वाडगाही भरून ठेवला. बिट्ट्याला आता खाणं शोधण्यासाठी किंवा पाणी मिळण्यासाठी लांब कुठंतरी जावं लागत नव्हतं. बसल्या जागीच सगळं मिळू लागलं होतं. बिट्ट्याची तशी चैन झाली होती. पण तरीसुद्धा बिट्ट्या अधूनमधून उदास व्हायचा. दु:खी-कष्टी बनायचा, कारण त्याला अरण्यातल्या मोकळ्या दिवसांची आठवण यायची. मऊ मऊ हिरव्या गवताची कुरणं, झुळझुळते गार गोड पाण्याचे झरे, रंगीबिरंगी फुलं, उडती फुलपाखरं, सरसर पळणाऱ्या खारूटल्या... ह्या सगळ्यांची आठवण यायची. मग त्याला पिंजऱ्यातली चैन नकोशी वाटायची, "या बंदीवासातून आपली कधी सुटका होईल का? कशी होईल? केव्हा होईल?..." बिट्ट्या मनाशी विचार करीत राहायचा.

तिकडं अरण्यात शिकाऱ्यांची आणखी एक टोळी पुन्हा एकदा आली. दोन पायांचे बरेच प्राणी टोळीत होते. जंगलात येताच त्यांनी आपल्या बंदुका सरसावल्या. 'धाड्-धाड्' गोळ्या झाडल्या. कितीतरी पशुपक्षी पटापट मरून पडले. सगळीकडं घबराट निर्माण झाली. पशु पक्षी भेदरून गेले. 'पळा पळा जीव वाचवा'... प्रत्येकजण एकमेकाला सांगू लागला. सगळीकडं जीव वाचवण्यासाठी पळापळ सुरू झाली. ससुल्या आणि दिपुली करवंदीच्या दाट जाळीत जाऊन लपली. भीतीनं दोघांचीही चिमुकली अंगं लटलट कापत होती, "हिंमत ठेवली पाहिजे, धीट बनलं

पाहिजे. घाबरून जाता कामा नये. हे दोन पायांचे मनुष्य नावाचे प्राणी काय करतील याचा नेम नाही! फार वाईट असतात ते!''

पुन्हा एकदा ऋतुपालट झाला. थंडीचे दिवस आले. सगळीकडं बर्फाची चादर पसरली गेली. बर्फावरून चालणं पळणं सगळ्या सशांना अवघड होऊन बसलं. खाणं मिळणं कठीण झालं. पण पोटातली भूक भागवलीच पाहिजे, म्हणून तसंच काहीसं चालत सशांचे गट लांबलांब खाणं शोधायला निघून गेले/

अलिकडं कित्येक दिवसांपासून एक कुत्रा अरण्यात भटकत होता. काही सशांच्या दृष्टीस तो पडला. पक्षांनी आणि खारींनी त्याला पाहिला होता. ही बातमी त्यांनी दुसऱ्या पशु-पक्ष्यांना दिली होती. त्या सगळ्यांनाच प्रश्न पडला होता की, 'हा या अरण्यात कशासाठी आला आहे?'

शेवटी एका खारीनं दबकत दबकत जाऊन त्याला सांगितलं. ''ए कुत्रोजी, तू आमच्या अरण्यातून निघून जा! लवक[illegible]ून ज[illegible]

''का म्हणून?'' कुत्र्यानं विचारलं

''तू माणसाचा गुलाम आहेस म्हण[illegible] [illegible]... इथं काय हवं आहे?''

''मी इथं आलो आहे ते तुमच्याबरोबर राहण्यासाठी, मी माणसाची गुलामी झिडकारली आहे.''

''का? कशासाठी?''

''माझ्या माणूस मालकानं आता एक नवीन मोठा कुत्रा आणला आहे. त्याला तो 'टायगर' म्हणतो. मी आता थोडा म्हातारा झालो ना! पूर्वीइतकं मला काही जोरानं पळता येत नाही. लांब झेप घेता येत नाही. जोरानं भुंकता येत नाही. आता तो टायगरचेच लाड करतो. मला मारतो.वाईट बोलतो. मग मी कशाला राहू? त्याच्याजवळ...'' असं

सांगून कुत्रा रडू लागला.

खार तिरस्कारानं म्हणाली, "कसला रे हा माणूस? किती वाईट स्वभावाचा आहे!"

पण तरीही त्या कुत्र्याला कुणी जवळ केलं नाही. कारण तो माणसाजवळ राहिला होता. माणसाइतकीच त्यांना त्याच्याबद्दलही भीती वाटायची. माणसाजवळ राहून हा माणसासारखाच झाला असला तर!... नकोच तो धोका. मात्र ते त्याला झिडकारायचे नाहीत. जेवढ्यापुरतं तेवढंच त्याच्याशी वागायचे.

कुत्रा बरेच दिवस एकटा एकटाच फिरत राहिला. मग कुठंतरी निघून गेला.

दोन पायांचे शिकारी प्राणी अरण्यात धुमाकूळ घालून निघून गेले. बरेचसे पशु-पक्षी त्यांनी मारून नेले. त्यांच्या हैदोसानं थरथरलेलं अरण्य मग शांत शांत झालं खरं, पण एक प्रकारची भीती सगळीकडं पसरून राहिली होती. त्यामुळं शिकारी निघून गेल्यावरही एकदोन दिवस कुणीच जाळीतून, झाडीतून, कपारीतून बाहेर पडलं नाही. मग हळूहळू भीतीही कमी झाली आणि भूकसुद्धा कडकडून लागली. एक एकजण खाणं शोधण्यासाठी हळूहळू बाहेर पडू लागले.

ससुल्या आणि दिपुलीदेखील करवंदाच्या जाळूतून बाहेर आली. अरण्य छान होतं. हिरवंगार गवत सगळीकडं दिसत होतं. हलक्याशा वाऱ्यावर डुलत होतं. वाराही छान गारगार होता. दोघांनाही खूप बरं वाटलं. मग दोघंही पळत सुटले. आपल्या जुन्या ठिकाणाकडं पळत पळत आले, तेव्हा ससुल्याला तिथं आपली आई बसलेली दिसली. आई दिसताच आनंदानं टणाटणा उड्या मारीत ससुल्या तिच्याजवळ गेला आणि 'आई' म्हणून तिच्या कुशीत घुसला.

ससुल्याला पाहून आईलाही खूप आनंद झाला. तिनं त्याचं अंग

मायेनं चाटूनपुसून घेतलं. त्याच्याकडं डोळे भरून पाहिलं. म्हणाली, ''केवढा मोठा झालास रे ससुल्या! मला सोडून गेलास, माझं ऐकलं नाहीस...'

''पण आई तू सांगितलेलं मी कधीसुद्धा विसरलो नाही. सतत सावध राहिलो. तुझी आठवण तर सारखी यायची. आई, आता नाही मी जाणार तुला सोडून कुठं.''

''असं कसं! तू तर आता खूपच मोठा झालास. माझ्याजवळ राहायला तू काय लहान आहेस? एवढं मोठं आपलं जंगल आहे. आणखीही कुठं कुठं अशीच जंगलं आहेत म्हणे! तू आणि ही दिपुली - तुमची मैत्री आहे ना! मग तुम्ही दोघंही अशाच मैत्रीनं बरोबर रहा. लांबलांब जा. हिंडा, फिरा सगळं बघा. मजा करा. आनंद लुटा. पण की नाई ससुल्या, आणि बरं का गं दिपुली, दोघंही सतत सावध रहा. बेसावध राहू नका. एकमेकांना सोडू नका!...''

आणि असं सांगून ससुल्याची आई चक्क निघूनसुद्धा गेली!

मग ससुल्या आणि दिपुलीसुद्धा पळत सुटली. लांब लांब अरण्यात निघून गेली!...

BVBK-0403543

3483 26/4/99
बा.वा